cmyk

## संपादकीय

### मतदान यंत्राचे भूत पराभुतांच्या मानगुटीवर !

काँग्रेससह देशातील अनेक विरोधी पक्ष ईव्हीएमवर शंका उपस्थित करीत आहेत. व्हीव्हीपॅटमधील पावत्यांची शंभर टक्के पडताळणी करण्याची मागणी करत विरोधकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु न्यायालयाने त्यांची मागणी धुडकावून लावत ईव्हीएमवर विश्वास व्यक्त केला होता. लोकसभा निवडणुकीत भाजपला 'चारसौ पार' जाता आले नाही. काँग्रेसने शंभरी गाठली, तरीही ईव्हीएमवरचे प्रश्नचिन्ह कायम आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### राज्यातील सहकारी संस्थेच्या निवडणुकांना स्थगिती

सोलापूरः पावसाचे कारण देत राज्यातील २४ हजार ७१० सहकारी संस्थेच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय गुरूवारी (दि.२०) सहकार, पणव व वस्त्रोद्योग विभागाने घेतला. त्यामुळे सहकारी संस्थेच्या निवडणुका तीन महिने पुढे गेल्या आहेत. राज्यातील १४ जिल्ह्यात १०० टक्क्यापेक्षा जास्त पाऊस पडला आहे. तर पाच जिल्ह्यात ७० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. त्यामुळे राज्यातील बहुतेक शेतकरी, सभासद हे खरीप हंगामातील पेरणीसाठी व्यस्त आहेत. शेतकरी, सभासदांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता येत नाही, हे कारण देत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने सहकारी संस्थेच्या निवडणुका तीन महिन्यांसाठी पुढे ढकलेल्या आहेत.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–७१ शुक्रवार दि.२१ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# हमीभावात अत्यंत तुटपुंजी वाढ

## केंद्र सरकारच्या निर्णयावर किसान सभेची नाराजी

**पुणे । प्रतिनिधी**

**केंद्रातील मोदी सरकारने विविध राज्यातील होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पाऊले उचलली आहेत. देशातील शेतकऱ्यांची नाराजी दूर करण्यासाठी आपल्या धोरणांमध्ये बदल करत हमीभाव वाढीला बुधवारी मंजूरी दिली. मात्र ती अत्यंत तुटपुंजी वाढ असून, देशातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा फलद्रूप करणारी ठरली नाही, अशी टीका किसान सभेने केली आहे. किसान सभेचे डॉ. अशोक ढवळे, जे.पी. गावीत, उमेश देशमुख आणि डॉ. अजित नवले यांनी निवेदन काढून केंद्रातील मोदी सरकारवर टीका केली आहे.**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीतील फटक्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आपल्या भूमिकेत बदल करेल असे वाटत होते. तसेच आपल्या शेतकरी विरोधी धोरणांमध्ये बदल करून खरीप हंगामात हमीभाव मुल्यात वाढ करून उत्पादन खर्चावर आधारित शेतकऱ्यांना परवणारे भाव जाहीर करेल अशी अपेक्षा होती. मात्र देशातील लाखो शेतकऱ्यांची ही अपेक्षा फलद्रूप झाली नाही, अशी टीका निवेदनातून करण्यात आली आहे. वाढता उत्पादन खर्च आणि पान २ वर

### मुख्यमंत्र्यांचीही मागणीच अमान्य...

*महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्रात कृषी मूल्य आयोगाच्या झालेल्या बैठकीमध्ये सोयाबीनला किमान ५३०० रुपये प्रति क्विंटल हमीभाव देण्याची मागणी केली होती. किसान सभेने परिषद घेऊन सोयाबीनचा उत्पादन खर्च पाहता किमान ७००० रुपये प्रति क्विंटल आधार भाव जाहीर करावा अशी मागणी केली होती. मात्र प्रत्यक्षात केंद्र सरकारने सोयाबीनला ४८९२ इतकाच हमीभाव जाहीर केला. जो मुख्यमंत्री शिंदेंच्या मागणी पेक्षा ४०८ रूपयांनी कमी आहे. तसेच कापसाच्या बाबतीत देखील केंद्राने मोठा फरक ठेवला आहे. कापसाला किमान १० हजार रुपये प्रति क्विंटल भाव देण्याची मागणी शेतकऱ्यांची असताना सरकारने ७१२१ रूपये जाहीर केला. जो शेतकरी आणि किसान सभेच्या मागणीपेक्षा २८७९ रूपयांनी कमी आहे. डाळी, तेल बियांच्या हमीभावात भरीव वाढ केल्याचा दावा सरकारने केला आहे. मात्र प्रत्यक्षात तसे होत नसून आधारभूत भावाप्रमाणे ते खरेदी केले जात नाहीत हेच वास्तव असल्याचे किसान सभेने म्हटले आहे.*

# केजरीवालांना जामीन मंजूर

### ईडीने विरोध करत मागितला ४८ तासांचा अवधी



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अखेर जामीन मंजूर करण्यात आला आहे. दिल्लीतील सेशन कोर्टने एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर त्यांना जामीन मंजूर केला आहे. दिल्ली मद्य धोरणामध्ये भ्रष्टाचार केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. या प्रकरणात त्यांना जामीन मिळाल्यानंतर आपच्या कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान, ईडीने या जामिनाला विरोध करत ४८ तासांचा अवधी मागितला आहे.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य घोटाळ्याशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात आरोपी बनवण्यात आले होते. ईडीने त्यांच्यावर कारवाई करत त्यांना अटक केली होती. या आधी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना मे महिन्यात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी तुरुंगाबाहेर येण्याची परवानगी देण्यात आली होती आणि त्यानंतर निवडणूक संपताच त्यांना तिहार तुरुंगात आत्मसमर्पण करण्याचे आदेश देण्यात आले होते. अरविंद केजरीवाल यांना आता नियमित जामीन मिळाला आहे. या निर्णयामुळे आम आदमी पक्षातही आनंदाचे वातावरण आहे.

# ओबीसींच्या रेट्याने सरकार नमले, आज शिष्टमंडळ वडीगोद्रीत येणार

## लक्ष्मण हाकेंच्या उशाला बसून विजय वडेट्टीवारांचा मुख्यमंत्र्यांना फोन; एकनाथ शिंदेंनी घेतली दखल







**वडीगोद्री । प्रतिनिधी**

**ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये म्हणून प्रा. लक्ष्मण हाके यांनी आठ दिवसापासून वडीगोद्रीत उपोषण सुरु केले आहे. ओबीसींच्या रेट्यापुढे राज्य सरकार नसले असून मराठा आरक्षण देताना आपण ओबीसींच्या आरक्षणाला कोणताही धक्का लागू देणार नाही असे आश्वासन देत शुक्रवारी दोन मंत्र्यांचे शिष्टमंडळ उपोषणकर्ते लक्ष्मण हाके यांच्या भेटीला येणार असल्याचे सांगितले. विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी हाके यांची भेट घेतली. यावेळी हाकेंच्या बाजूला बसून त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन लावला. आंदोलनाची दखल घ्या, शिष्टमंडळ कधी पाठवणार असे विचारल्यावर मुख्यमंत्र्यांची दखल घेत दि. २१ जून रोजी शिष्टमंडळ पाठवण्याचे आश्वासन दिले.**

ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागू नये या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे गेल्या ८ दिवसांपासून लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे उपोषण करत आहेत. त्यांच्या भेटीला राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार गेले होते. त्यावेळी त्यांनी पान २ वर

### प्रकाश आंबेडकरांनीही घेतली रोखठोक भुमिका

वंचित आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी लक्ष्मण हाके यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी रोखठोक भुमिका घेत मराठा आणि ओबीसींचे ताट वेगळे असले पाहिजे असे सांगितले. सध्याची परिस्थिती खुपच स्फोटक असून हे आपण सरकारला सांगितले असल्याचेही आंबेडकर म्हणाले.




### विजय वडेट्टीवार भावुक

लक्ष्मण हाकेंच्या भेटीला गेलेले विजय वडेट्टीवार यावेळी काहीसे भावुक झाल्याचे दिसून आले. ते म्हणाले की, ओबीसींच्या मागे उभे राहणे हे माझे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. सत्ता येते आणि जाते, पदाचा मी कधीच विचार केला नाही. हे छत्रपती शिवरायांचे, शाहू–फुले–आंबेडकरांचे राज्य आहे, असे ते म्हणाले.

### वाढवण बंदराला विरोध असतानाही केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी

मुंबईः पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराला शिवसेना उबाठा गटाने सातत्याने विरोध केला आहे. तसेच काँग्रेसनेही स्थानिकांच्या प्रश्नावरून वाढवण बंदराच्या उभारणीला विरोध दर्शविला आहे. त्यामुळे या वाढवण बंदराच्या उभारणीला स्थानिकांसह राजकिय पक्षांचा विरोधही वाढत आहे. मात्र नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बंदर उभारणी करण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. राज्याच्या विकासासाठी ही अत्यंत महत्वाची बाब असून यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे राज्याचे पान २ वर

# बिहारमधील वाढीव आरक्षण कोर्टाने फेटाळले; मराठा आरक्षणाचे काय?

### मनोज जरांगे काय करणार, राज्य सरकार आरक्षण कसे टिकवणार?





**मुंबई । प्रतिनिधी**

बिहार सरकारने ओबीसी आणि इतर जातींना जनगणना करून वाढवून दिलेले १५ टक्के आरक्षण आज कोर्टाने फेटाळले आहे. पाटणा उच्च न्यायालयाने नितीश सरकारला मोठा झटका दिला आहे. याचा महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाशी संबंध काय, असा अनेकांना प्रश्न असेल. इंदिरा साहनी खटल्याचा वारंवार उल्लेख या कोर्टात झाला. अशाच प्रकारचे आरक्षण महाराष्ट्र सरकारनेही दिले आहे. त्यामुळे ते आरक्षण कोर्टात टिकेल का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. आरक्षण टिकवायचे असेल तर मनोज जरांगे काय करणार आणि राज्य सरकार मराठा आरक्षण कसे टिकवणार ? याकडेच आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मराठा आरक्षण कोर्टात टिकेल काय?

बिहार आरक्षणासंदर्भातील निर्णय धक्कादायक आहे. बिहार सरकारचे आरक्षण कोर्टात टिकत नसेल, तर मराठा आरक्षण कसे टिकेल, याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

आरक्षण वाढवून देण्याच्या बिहार राज्य सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयाकडून दणका बसला आहे. पान २ वर

# राज्यातील महायुती सरकार ८ टक्के दराने २७ हजार कोटींचे कर्ज काढणार

### विधानसभेच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून होणार निर्णय



**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकानंतर आता जवळपास विविध निवडणूकांचा सपाटाच राज्यात सुरु झाला आहे. त्यातच आगामी दोन–तीन महिन्यानंतर विधानसभेच्या निवडणूका होऊ घातल्या आहेत. विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर एमएसआडीच्या विविध अर्धवट प्रकल्पासाठी आणि पुण्यातील प्रकल्पासाठी तब्बल २७ हजार कोटी रूपयांचे कर्ज चढ्या व्याज दराने काढण्याचा विचार राज्य सरकारकडून करण्यात असल्याची खात्रीशीर माहिती एमएसआरडीसीच्या एका अधिकाऱ्याने दिली आहे.

मागील १५ वर्षापासून मुंबई–गोवा दरम्यान सुरु राष्ट्रीय महामार्गाचे काम अद्याप पूर्णत्वास गेले नाही. विशेष म्हणजे या महामार्गासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करण्यात येतो. पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२० जून २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १०.०० क्विंटल | २,३३५ | २,७०० | २,४१६ |
| ज्वारी/हायब्रिड : १६.५० क्विंटल | २,००० | ३,२०१ | २,४४३ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,२०१ | ८,२०१ | ८,२०१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | १,८०० | २,६७० | २,२८२ |
| चिंच/लोकलः ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीनः १४५.५० क्विंटल | ४,३२५ | ४,४५१ | ४,४०८ |
| हरभराः ०.५० क्विंटल | ६,५११ | ६,५११ | ६,५११ |

# शक्तिपीठ महामार्गासाठी भूसंपादन करणार नाही

### चंद्रकांत पाटलांची मोठी घोषणा

**कोल्हापूर ।**

नागपूर –गोवा दरम्यान प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गासाठी होणाऱ्या भूसंपादनाला शेतकरी वर्गाचा मोठा विरोध होतो आहे. आता सरकारने हा विरोध पाहता मोठा निर्णय घेतला आहे. शक्तिपीठ महामार्गासाठी भूसंपादन न करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. स्वतः चंद्रकांत पाटलांनी कोल्हापुरात ही घोषणा केली आहे. दरम्यान शक्तिपीठाविरोधात आंदोलन करणाऱ्यांना देखील चंद्रकांत पाटलांनी टोला हाणला आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, महाराष्ट्रामध्ये शक्तीपीठ या विषयांमध्ये आम्ही भूसंपादन करणार नाही हे सरकारने ठरवले आहे, विषय संपला. काही लोकांना आंदोलन चालू ठेवायची आहेत. शक्तिपीठ महामार्ग येत्या १२ जुलैपर्यंत राज्य सरकारने रद्द करावा, तो महामार्ग पान २ वर

# नीट फेरपरीक्षेला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

### ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची २३ जून रोजी फेरपरीक्षा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

नीट परीक्षेत ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची २३ जून रोजी फेरपरीक्षा घेण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. या विद्यार्थ्यांना देण्यात आलेले ग्रेस गुण रद्द करून त्यांची फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) घेतला होता. मात्र, या फेरपरीक्षेच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर निर्णय देताना न्यायालयाने फेरपरीक्षेला स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे २३ जून रोजी या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा होणार आहे.

नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी व गोंधळप्रकरणी पान २ वर





# रखडलेला मान्सून पुन्हा सक्रिय

### महाराष्ट्रासह, केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडू राज्यांत मुसळधारेचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**मान्सून महाराष्ट्रात दाखल झाल्यापासून काही दिवसांपासून पावसाने महाराष्ट्रासह अनेक राज्यांत उघडीप घेतली आहे. मात्र पुढील काही दिवसांत महाराष्ट्रासह अनेक राज्यात पाऊस हजेरी लावण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे.**

हवामान विभागाने दिलेल्या बुलेटीनध्य पुढील पाच दिवस पान २ वर



### पुढील तीन दिवसांत मान्सून पुढे सरकणार

पुढील ३ ते ४ दिवसांत बिहारचा आणखी काही भाग आणि पूर्व उत्तर प्रदेशचा काही भाग, उत्तर अरबी समुद्र, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, वायव्य बंगालचा उपसागर, गंगेकडील पश्चिम बंगालचा काही भाग, उप–हिमालयीन पश्चिम बंगालचा उर्वरित भाग, झारखंडच्या काही भागात मान्सून पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे, असे हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.


### लोकमान्य मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह खुंटेफळ, ता.आष्टी, जि.बीड.

वस्तीगृहात सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी प्रवेश देणे चालू आहे. वस्तीगृह मान्य संख्या ४०+ ८ = ४८ खालील प्रमाणे प्रवेश देण्यात येईल.

| प्रवर्ग | | | |
|---|---|---|---|
| 1) SC | - 28 | 4) SBC | - 01 |
| 2) ST | - 02 | 5) OBC | - 06 |
| 3) VJNT | - 09 | 6) OPN | - 02 |

अधीक्षक काकडे बी.के. मो: ९२८४२४०३९९

मुख्याध्यापक सुंबरे आर.के मो. ८२६२०४२९२९


cmyk

## अग्रलेख

# मतदान यंत्राचे भूत पराभुतांच्या मानगुटीवर!

काँग्रेससह देशातील अनेक विरोधी पक्ष ईव्हीएमवर शंका उपस्थित करीत आहेत. व्हीव्हीपॅटमधील पावत्यांची शंभर टक्के पडताळणी करण्याची मागणी करत विरोधकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु न्यायालयाने त्यांची मागणी धुडकावून लावत ईव्हीएमवर विश्वास व्यक्त केला होता. लोकसभा निवडणुकीत भाजपला 'चारसौ पार' जाता आले नाही. काँग्रेसने शंभरी गाठली, तरीही ईव्हीएमवरचे प्रश्नचिन्ह कायम आहे. राहुल गांधी आणि अनेक विरोधी पक्षनेते ईव्हीएमवर संशय व्यक्त करत आहेत. मुख्य निवडणूक आयुक्तांपासून राज्य निवडणूक मंडळापर्यंत सर्वांनी ईव्हीएमविरोधातील आरोप सिद्ध करण्याचे आव्हान दिले होते परंतु एकानेही ते आव्हान स्वीकारले नाही. लोकसभेचे एकंदर निकाल विरोधकांच्या बाजूने असतानाही मतदान यंत्राविरुद्ध तक्रारी सुरूच आहेत. केंद्रात सत्ता स्थापनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी उपरोधिकपणे म्हणाले होते, आतातरी किमान पाच वर्षे ईव्हीएमवर शंका व्यक्त केली जाणार नाही.

ईव्हीएममध्ये छेडछाड करून दाखवण्याचे आव्हान स्वीकारायचे नाही मात्र, उगाच शंकाकुशंका व्यक्त करायच्या याला काय अर्थ? विरोधक केवळ आरोप-प्रत्यारोपात मग्न राहिले तर रोज तेच ते आरोप ऐकून सर्वसामान्य जनतेचा ईव्हीएमवरील आणि सार्वत्रिक निवडणुकीवरील विश्वासच उडेल. एलॉन मस्क यांच्या मतप्रदर्शनामुळे आता पुन्हा एकदा ईव्हीएम मशिनचे भूत भारतीयांच्या मानगुटीवर बसू लागले आहे. आता मस्क मतदान यंत्राबाबत पुरेसा खुलासा करीत नाहीत आणि निवडणूक आयोगाकडून याबाबत सविस्तर प्रतिक्रिया येत नाही तोपर्यंत हा वाद थांबण्याची शक्यता दिसत नाही. आतापर्यंत निवडणूक निकालानंतर ईव्हीएमविषयी तक्रारी केल्या जात होत्या. या संदर्भात निवडणूक आयोगाने वारंवार स्पष्टीकरणेही दिली आहेत. परंतु आता तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वांत मोठ्या तज्ज्ञाने या संदर्भात शंका उपस्थित केली आहे. ती दूर करताना निवडणूक आयोगाची कसोटी लागेल. म्हणजेच ईव्हीएमच्या शंकांविषयीचे आव्हान परतवून लावण्यासाठी निवडणूक आयोगालाच पुढाकार घ्यावा लागेल. केंद्र सरकारनेसुद्धा या संदर्भात मस्क यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या वक्तव्याचा मतितार्थ समजून घेतला पाहिजे. जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीवादी देशासाठी हा खुलासा महत्त्वाचा ठरेल. एलॉन मस्क यांच्या वक्तव्यातून देशात चर्चा सुरू झाली असतानाच मुंबईच्या उत्तर-पश्चिम मतदारसंघातून निवडून आलेल्या शिंदे गटाच्या रवींद्र वायकर यांच्या निकालाच्यावेळी ईव्हीएम मशिन लॉक केली गेल्याचा आरोप झाला आहे. तर आता पराभूत झालेले नगरचे माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांनीही ईव्हीएमवर संशय व्यक्त केला असून, चौकशीची मागणी केली आहे. म्हणजे एकाच वेळी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर या संदर्भातील वाद रंगू लागला आहे. या सगळ्या प्रकारात वस्तुस्थिती काय आहे हे स्पष्ट करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावरच आहे. ईव्हीएम ही एक स्वतंत्र प्रणाली आहे. ईव्हीएम मशिन लॉक होऊ शकत नाही. ईव्हीएम मशिनला कोणताही मोबाईल जोडता येत नाही, कोणताही ओटीपी दिला जाऊ शकत नाही. मुंबई उत्तर-पश्चिम मतदारसंघातील मतमोजणी केंद्रावरील घटना ही उमेदवाराच्या सहाय्यकाने मोबाईल फोन अधिकृतपणे वापरल्याची घटना असून या संदर्भात यापूर्वीच फौजदारी गुन्हा दाखल केला असून याबाबत अधिक तपास सुरू आहे, असे स्पष्टीकरण या मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी दिले आहे. निवडणुकीच्या मतदान कालावधीत काही ठिकाणी तांत्रिक बिघाडामुळे ईव्हीएम मशिन बंद पडण्याच्या घटना घडल्या अर्थात तात्काळ पर्यायी व्यवस्थाही करण्यात आली. त्यामुळे ईव्हीएम मशिन संदर्भात कोणत्याही तक्रारीला वाव नाही असा दावा निवडणूक आयोगाकडून केला जातो. एलॉन मस्क यांनी ईव्हीएम मशिन हॅक होऊ शकते असे वक्तव्य केले नसते तर हा वाद पुन्हा निर्माण होण्याची शक्यता नव्हती अथवा इतर कोणीही अशी शंका व्यक्त केली असती तर ती कोणीही गांभीर्याने घेतली नसती. मात्र, एकूणच मस्क यांचे या क्षेत्रातील स्थान आणि योगदान लक्षात घेता त्यांनी केलेल्या शंकेचे निरसन करणे आवश्यक बनले आहे. मानवी चुका होऊ शकतात त्या टाळाव्यात म्हणून आणि अचूक कार्यपद्धतीसाठी ईव्हीएम मशिनचा वापर करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. मस्क यांच्या विधानात थोडे जरी तथ्य आढळले तरी त्याचा परिणाम एकूणच देशाच्या निवडणूक प्रक्रियेवर होईल. तसे झाले तर नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीतील मतदानाबाबत शंका व्यक्त केली जाईल. तेव्हा मतदान यंत्राच्या शंकेबाबतचे चर्चेचे गुऱ्हाळ संपविण्यासाठी त्वरेने शंकानिरसन करणे अत्यावश्यक आहे.

## महेश आयुर्वेद कॉलेज आष्टी तर्फे ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश आयुर्वेद कॉलेज आष्टी यांच्यातर्फे दिनांक २०.०६.२०२४ रोजी माऊली मंदिर मुर्शदपुर आष्टी येथे आयुष्यमान आरोग्य मंदिर( )अंतर्गत ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी करण्यात आली ज्येष्ठ नागरिकांचे बीपी व रक्तातील साखर ,रक्तातील हिमोग्लोबिन ई.सी.जी ,डोळे तपासणी ,डायबेटिस ,हायपर टेन्शन ,हाडांचे आजार ,फुफ्फुसाचे आजार यांची मोफत तपासणी व औषधोपचार करण्यात आले. महेश आयुर्वेद हॉस्पिटल मधील डॉक्टर मोहिनी गोसावी, डॉक्टर अक्षता इथापे ,डॉक्टर पूनम मार्कंडे यांनी तपासणी केली.रक्तातील सर्व तपासण्या लॅब टेक्निशियन विशाल गोरे ,अमृता गरगडे यांनी केल्या ,औषध वाटप फार्मासिस्ट सुमित खिलारे यांनी केले ,डॉक्टर संभाजी गोसावी यांनी आरोग्य विषयी माहिती व आहाराचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी ११७ ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी करण्यात आली व मोफत औषधोपचार देण्यात आले यावेळी महेश आयुर्वेद कॉलेजचे प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थी व महेश आयुर्वेद हॉस्पिटल मधील इतर कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे नियोजन गौतम बोडखे यांनी केले तर माऊली मंदिर समिती व उपस्थितांचे आभार डॉक्टर सविता खेडकर यांनी मानले.



## विखे-पाटलांचे आशीर्वाद घ्यायला जाणार-खा. लंके

नगर | प्रतिनिधी

निवडणूक झाली आता मी त्यांच्याविरोधात टीका करणे योग्य नाही. झाले गेले ते सोडून द्यायचे असते, असे शरद पवार गटाचे खासदार निलेश लंके यांनी म्हटले आहे. तसेच विखे पाटलांचे आशीर्वाद घ्यायला जाणार असल्याचे म्हणत खासदार लंके यांनी विखे पाटील यांच्या सोबतचे वाद मिटवण्याचे संकेत दिले आहेत.

खासदार निलेश लंके म्हणाले, विखे परिवार हा जिल्ह्यातील मोठा परिवार आहे, त्यांचे सहकारामध्ये मोठे काम आहे. निवडणुकीमध्ये विरोधात बोलणे योग्य आहे. एखादा शब्द माझा घसरला एखादा त्यांचा गेला असेल पण जिल्ह्यात सहकारामध्ये मोठे नाव आहे. विरोधक आहे म्हणून कायमच विरोधात बोलायचे असे नसते. माझे एखादे काम असेल तर मी त्यांच्याकडे जाऊ शकतो, असे राजकारण पाहिजे. लहान माणसाने लहान माणसासारखे वागले पाहिजे. मी लवकरच त्यांचा आशीर्वाद घ्यायला जाणार आहे. दरम्यान, ''डॉ. सुजय विखे यांना अद्यापही पराभव मान्य होत नाही. त्यांनी आता तो स्वीकारला पाहिजे. पण विखे कुटुंबाला तसा इतिहास आहे. पूर्वी यशवंतराव गडाख यांच्याबाबतही विखे कुटुंबीय अशाच पद्धतीने वागले होते. आता ईव्हीएम व व्हीव्हीपॅटबाबत शंका उपस्थित केली म्हणजे विखे यांनी केंद्रीय यंत्रणांवरच आक्षेप घेतला आहे, असे खा.लंके म्हणाले.

## नीट व नेट परीक्षा गोंधळावरून विद्यार्थी भडकले, शिक्षणमंत्र्यांच्या घरासमोर निदर्शने

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

कथित पेपरफुटीच्या संशयावरून रद्द करण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षेतील (नेट) गोंधळाविरोधात आक्रमक झालेल्या विद्यार्थी संघटनांनी गुरूवारी नवी दिल्लीत शिक्षण मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन केले. निदर्शने करणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

आॅल इंडिया स्टुडेंट्स युनियनचे दिल्लीचे अध्यक्ष अभिज्ञान आणि जेएनयु विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष रणविजय यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी हे आंदोलन केले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सुटकेसाठी शिक्षण मंत्रालयाबाहेर ''रास्ता रोको'' आंदोलन करण्यात आले. नीट आणि नेट परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि गोंधळाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, युजीसीचे अध्यक्ष मामिदला जगदीश कुमार यांची हकालपट्टी करण्यात यावी, अशी आॅल इंडिया स्टूडंट युनियनची मागणी आहे. नीट व नेट परीक्षेतील गोंधळाविरोधात नॅशनल स्टुडंट्स युनियन आॅफ इंडिया (एनएसयुआय) संघटनेच्या कार्यकर्त्यांही शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या दिल्लीतील निवासस्थानाबाहेर तीव्र निदर्शने केली. यावेळी शिक्षणमंत्री व एनटीएच्याविरोधात घोषणा देण्यात आल्या. पोलिसांनी या आंदोलकांना ताब्यात घेतले.




## बीडमध्ये अॅड.पटेल दाम्पत्यासह चौघांकडून घरात घुसून धुडगुस

**बीड| प्रतिनिधी**

**कुटुंबातील कोणीही घरात नसताना बळजबरीने आत घुसून धक्काबुक्की आणि शिवीगाळ करत तुझ्या घरच्यांना बघून घेऊ असे म्हणत वकील दांपत्यासह चौघांनी धुडगूस घातल्याचा प्रकार पेठ बीड हद्दीत घडला. याप्रकरणी वकील अॅड.नासेर पटेल , त्यांची पत्नी आसमा पटेल यांच्यासह शरद झोंडगे , पायल पारवे या चौघाविरुद्ध पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. एका वकील दांपत्यावर पुन्हा दाखल झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे.**

बीड शहरातील खंडेश्वरी रोड पेठ बीड येथील सरिता इंद्रजीत पारवे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १९ जून २०२४ रोजी मी व माझी दोन मुले घरात होतोत. दीर सत्यजित यांचे किडनी ट्रान्सफरचे ऑपरेशन असल्याने माजी सासू , पती व कुटुंबातील इतर सर्वजण छत्रपती संभाजी नगर येथील कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये गेले होते. घरात मी माझ्या मुलासह एकटी असताना दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास ऍड.नासेर पटेल, त्यांची पत्नी आसमा नासर पटेल , शरद झोंडगे हे चौघेजण त्या ठिकाणी आले. अॅड. पटेल यांनी सत्यजित कुठे गेला? असे विचारले. त्यावर मी त्यांना ते इथे नाहीत त्यांचे ऑपरेशन झाल्याने छत्रपती संभाजी नगर येथील रुग्णालयात गेले आहेत असे सांगितले. तरीही पटेल यांनी घरात घुसण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मी त्यांना अडवले असता नासेर पटेल यांनी अरेरावी करत मला ढकलून दिले तर आसमा पटेल हिने शिवीगाळ केली. सत्यजित घरात नाहीत असे म्हणत असताना देखील पटेल यांच्यासह चौघेजण घरात घुसले आणि सत्यजित घरातच आहे असे म्हणून सर्व घरांमध्ये त्यास शोधू लागले. मी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता चौघांनीही मला धक्काबुक्की करून शिवीगाळ केली व तुला आणि तुझ्या घरच्यांना बघून घेऊ अशी धमकी दिली. यावेळी पटेल दाम्पत्यासोबत आणखी महिला देखील होती.मात्र तिचे नाव समजू शकले नाही. दरम्यान याप्रकरणी सरिता पारवे यांच्या फिर्यादी वरून ऍड.नासेर पटेल , त्यांची पत्नी ऍड.आसमा पटेल यांच्यासह शरद झोंडगे , पायल पारवे या चौघांविरुद्ध कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ , ३४ भादवी प्रमाणे पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## भेसळयुक्त खाद्यतेलाची खुलेआम विक्री

### एमआयडीसी भागातून संपूर्ण नांदेड जिल्ह्यात होतोय पुरवठा!

**नांदेड | प्रतिनिधी**

**जिल्ह्यात खाद्य तेलात भेसळीने कहर केला आहे. शहरांमध्ये अनेक खाद्य तेलात भेसळयुक्त विक्री होत असून अन्न सुरक्षा अधिकारी निष्क्रिय असल्याचे दिसून येतात खाद्यतेलाचे नमुने हे मॅनेज करून घेतल्या जातात असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. ग्रामीण भागात सर्रास पैकी खाद्य तेलात भेसळ करण्यात येत आहे. कमी किमतीच्या तेलाची पाम तेल, सरकी तेल, अशा तेलाची भेसळ सूर्यफूल ,शेंगदाणा केल्या जात असून खुल्या विक्रीमुळे भेसळ आढळून येत आहे. नांदेडच्या दोन्ही एमआयडीसी भागातून भेसळ युक्त खाद्यतेल संपूर्ण जिल्ह्यात वितरित होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सामान्य नागरिकांची आरोग्य धोक्यात येत असून अन्नभेसळ आयुक्ताकडे वारंवार तक्रार देऊन ही कुठलीच कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यांना धोका निर्माण करण्यास अन्न व औषध प्रशासन जबाबदार आहे हे स्पष्ट होत आहे.**

नांदेड शहरातील जुना मोंढा भागातील काही दुकानावरील खाद्यपदार्थाचे सॅम्पल अन्नसुरक्षा अधिकारी हे मॅनेज करून सॅम्पल घेतात यात अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण सबंध असल्याने काही धाब्याबरोबर मोठ मोठ्या उपहारगृहात तेलाचा वापर करण्यात येतो अशी धक्कादायक माहिती आहे . काही धाब्यावर शिळे नागरिकांना खाऊ घातल्या जाते यासंदर्भात योग्य ती चौकशी होणे गरजेचे आहे परंतु अन्नसुरक्षा अधिकारी तर काहींना सूचना देऊन सोडून देतात . शहरांमध्ये एक्सपायरी झालेले खाद्य अन्य विकल्या जात आहे त्यात बेकरी अॅटम व वेगवेगळ्या कंपनीचे पॅकिंगचे खाद्य आणि सुरक्षित आहेत किंवा नाही याची तपासणी अद्यापही अन्नभेसळ पथक करत नसल्यामुळे खुलेआम पणे बाजारामध्ये एक्सपायरी झालेले पदार्थ विकताना ग्राहकांना आढळून येत आहेत. लवंगचे तेल काढून त्या विक्री केल्या जात आहेत. हळदीमध्ये मक्याचे पीठ वापरल्या जात आहे. अनेक स्वीट मार्ट मधून मिठाई घेतल्यास ते भेसळयुक्त असल्याच्या तक्रारी काही दिवसापूर्वीच अन्न भेसळ कार्यालयात दिले आहे. परंतु त्यांना भेसळ कार्यालयाचा भोंगळ कारभारामुळे अद्यापही कुठल्याही अन्नभेसळ करणाऱ्या दुकानावर कुठलीच कारवाई झालेली दिसत नाही. त्याचप्रमाणे पतंजली सारख्या दुकानातून आरोग्यास घातक असलेल्या खाद्यान्न पदार्थाची मोठ्या प्रमाणात बाजारात विक्रीसाठी येत आहेत. याबाबतच्या तक्रारीही अन्नभेसळ आयुक्ताकडे दिले असल्याचे पाहावयास मिळत आहे. ग्रामीण भागातही आठवडी बाजारात अन्नभेसळ पदार्थांची खुलेआमपणे विक्री होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असलेल्या दोषी अन्न सुरक्षा अधिकारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी सामान्य नागरिकांतून होताना दिसत आहे.

## बुडीत युवकाचा २४ तासानंतर शोध

**परळी | प्रतिनिधी**

**परळी तालुक्यातील कण्हेरवाडी येथील युवक भोपळा येथील तलावात पोहताना बुडाला.सदरील युवकाचा मृतदेह २४ तासानंतर गुरुवार दि २० जून रोजी सकाळी आठच्या सुमारास तलावात सापडला. गणेश माणिकराव फड (वय २२) असे युवकाचे नाव आहे. मृतदेह आढळून आल्यानंतर उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणी करण्यात आली. दुपारी कन्हेरवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.**



परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथील गणेश माणिकराव फड हा पुणे येथे इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होता. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी सुट्टीमुळे तो कन्हेरवाडी येथे आपल्या गावी आला होता. दोन-चार दिवसांनी पुण्याला परत जाणार होता. दरम्यान काल बुधवारी दि १९ जून रोजी सकाळी ८ च्या सुमारास मित्रासह भोपळा तलावात पोहण्यासाठी गेला असता पाण्याचा प्रवाह आणि खोलीचा अंदाज न आल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला होता. दरम्यान घटनेची माहिती मिळताच परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसिलदार बाबुराव रुपनर आदी घटनास्थळी दाखल झाले होते.या शोध कामी परळी नगर परिषदेचे अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अहोरात्र प्रयत्न केले.

## पान १वरून...

### हमीभावातील

केंद्राने शेती अवजारांवर लावलेला जीएसटी पाहता दिलेली हमीभाव वाढ अत्यंत तुटपुंजी आहे. सरकारचा हा निर्णय एक प्रकारे शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळणारा आहे असाही निशाना निवेदनातून साधण्यात आला आहे. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार सी २ + ५०% म्हणजेच सर्वंकष उत्पादन खर्चावर आधारित दीडपट हमीभाव दिला तरच शेतकऱ्यांना शेती परवडू शकेल अशी परिस्थिती आहे. केंद्र सरकारने मात्र सर्वंकष उत्पादन खर्च गृहीत न धरता केवळ ए २ + एफएल म्हणजेच निविष्ठा व कुटुंबाची मजुरी एवढाच उत्पादन खर्च विचारात घेतल्याचा आरोप किसान सभेने केला आहे. तसेच शेती उत्पादन आणि उत्पादनाचा खर्च यात राज्या राज्यांत देखील फरक असून केंद्राने याचा विचार केला नाही, असे देखील निवेदनातून स्पष्ट करण्यात आले आहे.

------------

### ओबीसींच्या रेट्याने सरकार नमले,

मुख्यमंत्र्यांना फोन लावून त्या ठिकाणच्या परिस्थितीची जाणिव करून दिली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी शुक्रवारी दोन मंत्र्यांचे शिष्टमंडळ चर्चेसाठी येणार असल्याचे आश्वासन दिले. हाके यांनी तब्येतीची काळजी घ्यावी, ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागणार नाही याची आपण काळजी घेतली आहे असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले. तुम्ही आश्वासन द्या, तुमचेच मंत्री गिरीश महाजन म्हणालेत सगेसोयऱ्यांचा विषय न्यायालयात टिकणार नाही असे विजय वडेट्टीवारांनी मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली. उपोषणकर्ते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांना विजय वडेट्टीवार यांनी पाणी पिण्याचा आग्रह केला. त्यानंतर दोन्ही आंदोलकांनी पाणी घेतले.

----------

### राज्यातील महायुती सरकार ८ टक्के

तो निधीही खर्च होतो. मात्र रस्त्याचे काम काही केल्या पूर्ण होताना दिसत नाही. तसेच मुंबई-नागपूर दरम्यानचा समृद्धी महामार्ग पूर्ण केल्यानंतर आता नागपूर गोवा व्हाया मुंबई असा नवा मार्ग उभारणीचे काम राज्य सरकारच्या अखत्यारीत असलेल्या एमएसआरडीसीने हाती घेतले आहे. हा मार्ग रेवस-रेड्डी महामार्ग, विरार ते अलिबाग बहुद्दीशीय महामार्ग, ग्रीनफिल्ड कोकण द्रुतगती महामार्ग, वर्सोवा-विरार सादरी किनारा मार्ग आदी या सर्व प्रकल्पासाठी एमएसआरडीसीला जवळपास २२ हजार कोटी रूपयांची आवश्यकता असल्याची माहितीही यावेळी देण्यात या अधिकाऱ्याने दिली. त्याचबरोबर पुणे येथील रिंगरोडसाठीही मोठ्या प्रमाणावर निधी लागणार आहे. पुणे शहराच्या पश्चिम महामार्गासाठी लागणाऱ्या जवळपास ९२ चक्के जमिनीचे अधिग्रहण एमएसआरडीसीकडून करण्यात आले आहे. तर ८ टक्के जमिनीचे अधिग्रहण लवकरच होणार असल्याचेही एमएसआरडीसीच्या अन्य एका अधिकाऱ्याने यावेळी सांगितले. तसेच पुणे शहराच्या पश्चिमेबरोबरच पूर्वेलाही रिंगरोड उभारण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे शहराच्या पूर्व भागात रस्त्याच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर जमिन लागणार आहे. त्यासाठी निधीची आवश्यकता लागणार आहे. यासाठी अंदाजीत खर्च ५ हजार कोटी रूपयांचा गृहीत धरण्यात आला आहे. त्यामुळे मात्र सध्या मेट्रोची आणि विविध अशा रस्त्यांच्या कामाची अनेक अशी कामे सध्या सुरु असल्याने आता नव्याने विकास कामे सुरु करायची असतील तर पुन्हा कर्ज काढण्याशिवाय पर्याय नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले.

**मंत्रीमंडळात ठेवणार प्रस्ताव...**

दरम्यान २७ हजार कोटीच्या कर्जाऊ रकमेचा प्रस्ताव या आगामी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येणार असून, त्यास अंतिम मंजूरी देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयातील अधिकाऱ्याने सांगितले.

---------

### बिहारमधील वाढीव आरक्षण कोर्टाने

आरक्षणाची व्याप्ती ५० टक्क्यांवरून ६५ टक्के करण्याचा बिहार सरकारचा निर्णय पाटणा उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. याचिकाकर्ते गौरव कुमार आणि इतरांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी पूर्ण केल्यानंतर ११ मार्च रोजी न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. पाटणा उच्च न्यायालयाने आज या प्रकरणात महत्त्वाचा निर्णय दिला आहे. शिक्षण संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये एससी, एसटी, ईबीसी आणि इतर मागासवर्गीयांसाठी राज्य सरकारच्या ६५ टक्के आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना पाटणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. राज्य सरकारने आणलेला कायदा रद्द करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेले १० टक्के आरक्षण कसे टिकणार आणि सरकार त्याला कसे टिकवणार? हा प्रश्न सध्या समोर आला आहे.

----------

### नीट फेरपरीक्षेला स्थगिती देण्यास

देशातील विविध उच्च न्यायालयांत दाखल झालेल्या याचिकांवरील सुनावणीला स्थगिती देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी (दि.२०) दिला आहे. तथापि, वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या समुपदेशनावर (काऊन्सेलिंग) स्थगिती देण्यास मात्र, सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा नकार दिला आहे. स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनेसह ४९ विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती एस.व्ही.एन भाटी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीची सीबीआय चौकशी करून ६२० पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची फॉरेन्सिक तपासणी करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीसंदर्भात देशातील ७ उच्च न्यायालयांमध्ये दाखल झालेल्या याचिका सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रीय चाचणी संस्थेनेही (एनटीए) याचिका दाखल केली. या याचिकेवर सुनावणी करताना खंडपीठाने गेल्या आठवड्यात केंद्र सरकार आणि एनटीएला नोटीस बजावली होती. खंडपीठाने नोटीस बजावल्यानंतरही उच्च न्यायालयांमध्ये नीटप्रकरणी सुनावणी सुरूच असल्याची बाब एनटीएचे वकील वर्धमान कौशिक यांनी खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिली. खंडपीठाने याबाबत दखल घेऊन राजस्थान, कोलकाता आणि मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीला स्थगिती दिली.

**'त्या' विद्यार्थ्यांच्या फेरपरीक्षेचे प्रवेशपत्र जारी**

एनटीएने ग्रेस गुण दिलेल्या १५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा २३ जून रोजी घेण्यात येणार असल्याचे एनटीएने न्यायालयात सांगितले होते. त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र जारी करण्यात आले असून फेरपरीक्षेचा निकाल ३० जून रोजी जाहीर केला जाणार असल्याची माहिती एनटीएने न्यायालयात दिली.

------------

### शक्तिपीठ महामार्गासाठी

रद्द झालाच पाहिजे या मागणीसाठी कोल्हापुरात जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात खासदार शाहू छत्रपती, आमदार सतेज पाटील, आमदार ऋतुराज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह अनेक चळवळीतले कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. शक्तिपीठ महामार्ग येत्या १२ जुलैपर्यंत राज्य सरकारने रद्द करावा नाहीतर तीव्र आंदोलन करू, असा इशारा आमदार सतेज पाटलांनी दिला होता. या महामार्गामुळे बारा जिल्ह्यातील २७ हजार ५०० एकरांची जमीन हस्तांतरित होणार होती. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाविरोधात कोल्हापुरातील शेतकरी आक्रमक झाले होते. ठेकेदारांची शक्ती वाढवण्यासाठी गरज नसताना महामार्गाचा घाट घातल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. हा महामार्ग वर्धा जिल्ह्यातून सुरू होऊन यवतमाळ, नांदेड, धाराशिवमार्गे सिंधुदुर्ग येथे संपणार आहे.

------------

### रखडलेला मान्सून

महाराष्ट्रासह, केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडू या दक्षिणेकडील राज्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. पुढील २ दिवसांत उप-हिमालयीन भाग, पश्चिम बंगाल, आसाम आणि मेघालयात या राज्यांत देखील मुसळधार ते अति मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे आणि त्यानंतर पुढे मुसळधार पाऊस सुरू राहणार आहे. तसेच पुढील ४-५ दिवसांत देशातील बहुतांश भागात उष्णतेची लाट नसणार आहे, अशी शक्यता देखील हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून रखडलेला नैऋत्य मान्सून सध्या सक्रिय झाला आहे. दरम्यान तो विदर्भ, छत्तीसगड, ओडिशा, वायव्य बंगालचा उपसागर, उप-हिमालयीन भाग, पश्चिम बंगाल आणि बिहारच्या काही भागांमध्ये पुढे सरकला आहे.

-----

### वाढवण बंदराला विरोध असतानाही

बंदरे विकास मंत्री संजय बनसोडे यांनी आभार मानले. जगातील १० मोठ्या बंदरापैकी देशातील वाढवण हे एकमेव मोठे बंदर असणार आहे.

----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २१ जून २०२४
३

# महावितरण कार्यालयाचा बेजबाबदारपणा व गलथान कारभारामुळे केज शहरातील नागरिकांच्या जीवितास धोका

**केज । प्रतिनिधी**

केज येथील महावितरण कार्यालयाचा बेजबाबदार पणा व गलथान कारभारा मुळे शहरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,महात्मा फुले नगर भागातील महावितरण कार्यालयाचा विद्युत पुरवठा करणारा जे.के.फंक्शन हॉलच्या समोरील रोहित्र हा उघड्यावर आहे या रोहित्राला वीज पुरवठा करणारे केबल(वायर) हे उघडे असून सदर उघडे केबल असल्यामुळे त्या केबल मधील विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा उघड्या आहेत.तसेच या रोहित्राचा बोर्ड पूर्णपणे खराब झालेला आहे. यामध्ये फ्युज देखील नाहीत व या बोर्डातील केबल (वायर) जळल्या मुळे उघडे आहे फ्युज गेल्यानंतर फ्युजटाकायला जाणाऱ्या व्यक्तींला स्वतःचा जीव धोक्यात घेऊन फ्युज टाकावा लागत आहे.सदर रोहीत्रा लगत तारांचे कुंपण आहे.

# ज्ञान आणि विज्ञानात झेप घेण्याची ताकद असते- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस विज्ञानाची प्रगती होऊ लागली आहे. गुणवत्तेवर प्रत्येक विद्यार्थी आपले कौशल्य दाखवत पुढे जात आहे. झेप घेण्याची ताकद ज्ञान आणि विज्ञानात असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

आदर्श शिक्षण संस्थेच्या वतीने रामकृष्ण लॉन्सच्या सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात सुप्रसिद्ध व्याख्यात्या डॉ.प्रतिमा श्योरे यांचेही मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. कालिदास थिगळें, विलास बडगे, नानासाहेब काकडे , रोहित क्षीरसागर, अरुण डाके, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, विजुताई महिंद्रे, सुधाकर मिसाळ, डॉ.अरुण भस्मे, अर्जुन बहिरवाल, अरुण बोंगाणे, शिवाजीराव जाधव, उषाताई सरवदे, विलास विधाते, राणा चौव्हाण, मुखीद लाला आदींची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.राजा मचाले यांनी केले तर संस्थेत शिक्षण घेत असलेल्या गायत्री जगताप, श्रावणी दहिवाल, अथर्व भांगे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तर ॲड. कालिदास थिगळे, विजुताई महिंद्रे, विशाल गायके यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, १९५५ साली स्व.काकूंनी आदर्श शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ही शिक्षणाची गंगा आणली. जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी आणि विद्यार्थिनी घडवून स्वयंपूर्ण करणारी संस्था म्हणून नावारूपाला आली आहे. दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात बदल होऊ लागले आहेत. गुणवत्तेवर आधारित प्रत्येक विद्यार्थी पुढे जात आहे. त्यामुळे झेप घेण्याची ताकद ज्ञान आणि विज्ञानात आहे. आपल्या संस्थेबरोबरच बीड शहरातील मिलीया संस्थेतील गुणवंतांचा देखील आपण गौरव केला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत पालकांचा महत्त्वाचा वाटा असतो त्यामुळे पालक मेळावा देखील ठेवला आहे. गुणवत्ता



ही कुठल्या जातीवर ठरत नसते कुठलीही जात असो त्याला ओलांडून गुणवत्ता जो मिळवतो तोच पुढे जातो. या संस्थेतून दहावी वर्गातून बत्तीस हजार विद्यार्थी तर इयत्ता बारावी वर्गातून ४२ हजार विद्यार्थी यश मिळवून पुढे गेले आहेत. आई-वडिलांनंतर शिक्षक हाच गुरु असतो खुल्या जगात गुणवत्ता हीच आयुष्यात भरारी घेणारे माध्यम आहे. पूर्वी डॉक्टर आणि इंजिनियर झालं की मोठं कौतुक व्हायचं पण आज त्याही पुढचे शिक्षण सहज उपलब्ध झाले आहे. बीडमध्ये एमबीबीएस शिक्षणाची व्यवस्था व्हावी यासाठी आपण मेडिकल कॉलेजची मागणी केलेली आहे. जगाच्या पाठीवर ज्ञानविज्ञानासह अनेक उपक्रम सुरू झाले आहेत. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा अभ्यास करून भविष्यातील तंत्रज्ञानाचा फायदा घ्यावा. आदर्श शिक्षण संस्थेने गुणवत्तेचा दर्जा टिकवला असून नव्या पिढीच्या दृष्टीने नवनवीन उपक्रम देखील हाती घेतले आहेत. जसे शिक्षण सुरू असते तसा अभ्यासक्रमाही बदलत जातो. त्या दृष्टिकोनातून शिक्षक वर्ग देखील त्याच पद्धतीने काम करत आहे असे सांगून त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना डॉ.प्रतिमा श्योरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्याला घडवत असताना प्रथम त्याला कोणते शिक्षण घ्यायचे याची निवड करावी लागते. नसता पुढे जे करायचे त्यासाठी लागणार्या विषयाचे शिक्षण तेव्हा त्याच्याकडे उपलब्ध नसते. दिवसेंदिवस टेक्नॉलॉजीत प्रचंड बदल होऊ लागला आहे. पहिले शिक्षण पूर्ण होईपर्यंत पुढचा बदल दिसू लागला आहे. अध्ययनात गुडी आवश्यक असते जे काम करायचे त्यास आपली तयारी आणि आवड असायला हवी हजारो मार्ग आहेत. कुठलातरी एक मार्ग कोणी म्हणतो म्हणून निवडू नका तुम्हाला जे व्हायचे आहे . त्यासाठी मेहनत आणि अभ्यास असायलाच हवा स्वतःला समजून घेत जाणून घेत तशी तयारी विद्यार्थ्यांनी करायला हवी. जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तर शिक्षणामुळे अडचणी निर्माण होऊ नयेत याची खबरदारी घ्यायला हवी,पालकांनी देखील आपल्या पाल्याला त्याच्या आवडीचे शिक्षण देणे महत्वाचे आहे. नसता व्हायचं होत पण शिकतोय इंजिनिअरिंग मग त्यात तो यशस्वी होतो की नाही. प्रत्येक गोष्टीत प्लॅनिंग महत्वाची आहे ती इयत्ता दहावीपासूनच हवी,पाया मजबूत असेल तर ज्ञानाची बिल्डिंग उभी राहते असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे प्रशासक डॉ.राजा मचाले, कार्यवाह एम.ए.राऊत, सखाराम मस्के, सुभाष क्षीरसागर, विजय सरवदे, सुग्रीव रसाळ, विकास चौधरी, राम भांडवलकर, सिध्देश्वर आर्सुळ, चंद्रकांत पेंढारे, सुरेश काशिद, आदर्श शिक्षण संस्थेतील सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आदर्श शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडवणी येथील प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेशउत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

संस्कार शिक्षण मंडळ,वडवणी संचलित प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना इंग्लिश स्कूलची ओढ लागावी व आस्था निर्माण व्हावी यासाठी इंग्लिश स्कूल सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत प्रभावी दर्जेदार तसेच उत्सुकतेने होण्यासाठी प्रवेशउत्सव कार्यक्रमाचे आयोजन इंग्लिश स्कूलमध्ये करण्यात आले होते.

सविस्तर वृत्तांत असा की,वडवणी शहरातील इंग्लिश स्कूलच्या शिक्षण क्षेत्रामध्ये अग्रगण्य स्थानी असलेल्या प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये



शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षाच्या पहिल्याच दिवशी नर्सरी,एलकेजी,युकेजी तसेच फर्स्ट क्लास ते सिक्स क्लास मधील विद्यार्थ्यांचे इंग्लिश स्कूलच्या प्रवेशद्वारावर वेलकम नावाची रांगोळी काढून तसेच इंग्लिश स्कूलच्या कार्यालयीन प्रभारी तथा मार्गदर्शिका श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,सौ.प्रियांका कुरकुटे मॅडम तसाच इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती शितल लाटणे मॅडम,श्रीमती नितल लोकरे मॅडम,श्रीमती फासे मॅडम,श्रीमती डोईफोडे मॅडम,सौ.शिंदे मॅडम यांच्यासह इंग्लिश स्कूल मधील टीचर यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व पालकांना बुके देऊन मोठ्या उत्साहात,आनंददायी वातावरणात प्रवेशउत्सव प्रसंगी स्वागत करण्यात आले इंग्लिश स्कूलच्या पहिल्या दिवशी विविध खेळ स्पर्धेचे आयोजन केले त्यामुळे विद्यार्थ्यांना पहिल्या दिवसापासून इंग्लिश स्कूलची आवड निर्माण होण्यासाठी मदत झाली.

विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्लिश स्कूल बद्दल भीती जावी आणि आपुलकी निर्माण व्हावी म्हणून प्रवेश उत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले असे मत प्रवेशउत्सव प्रसंगी इंग्लिश स्कूलच्या मार्गदर्शिका श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी व्यक्त केले याप्रसंगी इंग्लिश स्कूलच्या श्रीमती तांबडे मॅडम, सौ.केदार मॅडम,सौ.चव्हाण मॅडम,सौ.बनसोडे मॅडम इंग्लिश स्कूलचे मोठ्या संख्येने विद्यार्थी व त्यांचे पालक वर्ग उपस्थित होता.

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आगळीवेगळी इंग्लिश स्कूल पाहून खूप आनंद झाला.

# लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कऱ्हेवाडीत केशर आंब्याची एक हजार रोपे वाटप; तरुणांनी राबवला सामाजिक उपक्रम

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवाडी येथील तरुणांनी सामाजिक भान राखून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या उदात्त हेतूने स्थापन केलेल्या निस्वार्थी सामाजिक सेवाभावी संस्थेच्या वतीने भाजपचे दिवंगत नेते केंद्रीय मंत्री लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त ग्रामस्थांना केशर आंब्याची एक हजार रोपे वाटप करून महावृक्षदान केले. प्रत्येक घरी आंब्याची रोपे दिल्याने गावामध्ये येत्या काही काळात गावात झाडे दिसणार आहेत.यामुळे सावली तर मिळणारच आहे परंतु गावात बाहेरून आंबे आणायाची




आवश्यकता राहणार नाही. तरुण मुले ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक चळवळ उभी करून गरजूंना मदतीसह सामाजिक उपक्रम राबवत आहेत.या ग्रुपमधील तरुणांचे गावकऱ्यांनी आभार मानले आहेत तर त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

वृक्ष तोडीमुळे जंगले नष्ट होत आहेत, उत्खननामुळे डोंगर नामशेष होऊ लागली आहेत. परिणामतः पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होऊन ग्लोबल वॉर्मिगचा धोका वाढत चालला आहे. भविष्यातील धोका ओळखून पर्यावरण वाचविण्यासाठी तालुक्यातील कऱ्हेवाडी येथील तरुणांनी सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत.नुकत्याच लोकनेते दिवंगत नेते केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या पार पडलेल्या पुण्यतिथी च्या निमित्त संकल्प करून रोपे वाटण्याचा निर्णय घेतला .निस्वार्थी सामाजिक सेवाभावी संस्था नोंदणीकृत असुन यामध्ये एकूण ९८ सदस्य आहेत.हे सर्व तरुण बाहेर नोकरी, उद्योग विविध क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांनी व्हॉट्सअप ग्रुपच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांना आर्थिक सहाय्य करत आहेत. ८० ते ९० हजार रुपये खर्च करून केशर आंब्याची प्रत्येकी ३ झाडे गावकऱ्यांना मोफत वाटप केले आहेत.पुढील वर्षी नारळ झाड देणार असल्याचा त्यांचा मानस आहे. आदर्श घेण्यासारखे सामाजिक काम हे तरुण करत आहेत.

# शिवतीर्थावर शिवराज शक ३५१ व शिवराज्याभिषेक दिन उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी (दि:-२० जून २०२४) रोजी बीड येथील शिवतीर्थावर (छत्रपती शिवाजी महाराज स्मारक) शिवराज शक ३५१ प्रारंभ व शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला राज्याभिषेकासाठी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान बीड कडून ७ तीर्थक्षेत्र गडकोटांवरील पाणी आणण्यात आले होते. आई तुळजाभवानी,राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब,धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना वंदन करून सात गडकोट-नद्यांच्या पाण्याने छत्रपती शिवाजी महाराजांना जलाभिषेक घालण्यात आला, तसेच




छत्रपती श्री शिवशंभूच्या नेतृत्वाखाली शिवकार्य असेच घडत राहो व श्री शिवाजी श्री संभाजी रक्तगटाचा तरुण घडण्यासाठी असेच निस्वार्थी शिवकार्य करणाऱ्या तरुणांनी शिवतीर्थावर महाराजांकडून प्रेरणा घ्यावी असेही सांगण्यात आले. सदरील कार्यक्रमास श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान बीड,श्री शिवतीर्थ परिवार बीड व सर्व शिवभक्तांचे सहकार्य लाभले.

# ज्ञानदीप विद्यालयात बालहक्क कायदेविषयक जनजागरण शिबीर

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय, किल्ले धारूर येथे तालुका विधी सेवा समिती, धारूर तथा वकील संघ, धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालया मध्ये बालहक्क कायदेविषयक जनजागरण शिबीर संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष दिवाणी न्यायाधीश.एन. एम. वाली उपस्थित होते, बालहक्क कायद्या विषयी त्यानी मार्गदर्शन केले. तसेच वकिल संघाचे अध्यक्ष अड पी. डी.मिश्रा,ॲड.आर.पी.गोरे ॲड.एम.बी.भोसले,




ॲड.आर. के.गायसमुद्रे, ॲड.डी.बी.मुंडे, ॲड.एम. बी.वाव्हळ इत्यादी कायदेविषयक मार्गदर्शन केले.यावेळी वकीलमंडळी उपस्थित होते. उपस्थित मान्यवारांनी विध्यार्थ्यांना बाल कायद्याविषयी सखोल मार्गदर्शन केले.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुंजाराम निरडे यांनी व आभार अशोक अंडील यांनी मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.. यआवेळी विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सन्मान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा नुकताच सन्मान व सत्कार विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. या सत्कार समारंभ प्रसंगी श्री बालाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, प्रा वसंत चव्हाण, प्रा दामोदर थोरात, प्रा बी आय खडकभावी,संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, शंभुलिंग शिवाचार्य संस्थानचे अध्यक्ष त्याचबरोबर योगेश गिरवलकर लातूर त्याचबरोबर व्यंकटराव मेणकुदळे परळी हे उपस्थित होते.

या सन्मान सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलन व माता सरस्वती देवीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.सदरील कार्यक्रमाचे प्रस्ताविक करतांना राजकिशोर मोदी यांनी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन करत त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था ही अतिशय नावाजलेल्या संस्थेपैकी एक असल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. अंबाजोगाई शहरात मागील २५ ते ३० वर्षापासून संस्थेच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या टी बी गिरवलकर इंजिनिअरिंग तथा पॉलिटेक्निक महाविद्यालयाने प्राचार्य डॉ बी आय खडकभावी यांच्या माध्यमातून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य राज्यात देखील आपला शैक्षणिक दबदबा निर्माण केला होता. महाविद्यालयाचे विद्यार्थी मागील ७ ते ८ वर्ष विद्यापीठात सुवर्णपदकाचे मानकरी ठरत होते. प्राचार्य खडकभावी यांनी इंजिनिअरिंग महाविद्यालय अत्युच्च शिखरावर नेऊन ठेवले होते. खडकभावी सरांनी वेळप्रसंगी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना महाविद्यालयात मोफत किंवा स्वखर्चाने



ॲडमिशन देऊन त्यांचे भविष्य उज्वल केले आहे. त्यांचे महाविद्यालयासाठीचे योगदान वाखाणण्याजोगेच होते. मात्र मध्यंतरीच्या काळात संस्थेच्या तथा संचालक मंडळाच्या अंतर्गत कलहामुळे महाविद्यालयाची थोडी पीछेहाट झाली होती. मात्र सध्या नवीन निवडून आलेले नवनिर्वाचित संचालक मंडळ हे मागील सगळी कसर भरून काढण्यासाठी प्रयत्न करून पुन्हा एकदा इंजिनिअरिंग तसेच पॉलिटेक्निक महाविद्यालयास गतवैभव प्राप्त करून देतील अशी अपेक्षा देखील याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली.

सन्मान व सत्कार करण्यात आलेल्या संचालक मंडळामध्ये महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचेनवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ वसंतराव सांगवे, उपाध्यक्ष माधवराव त्रिंबकराव पाटील टाकळीकर, सचिव माधवराव हनुमंतराव पाटील,सहसचिव सुनील सिद्रामप्पा मिटकरी, कोषाध्यक्ष विजय नागनाथअप्पा रेवडकर,कार्यकारी संचालक प्रदीपकुमार विश्वनाथन अप्पा दौंडीगावे, संचालक राजेश्वर वैजनाथराव बुके,बसवराज गुरुपादअप्पा येरटे,सौ, ललिता हवगिराव पांढरे,राजेश्वर नानासाहेब पाटील,बाबुराव विठ्ठलराव तरगुडे,प्रभुअप्पा शिवलिंगअप्पा पटणे,काशिनाथ गुणवंतअप्पा साखरे,गुरलिंगअप्पा मल्लिकार्जुनअप्पा धाराशिवे, महेश वीरभद्रअप्पा हालगे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

आपल्या सत्काराला उत्तर देताना महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी आम्हा सर्वांना बोलावून सर्व संचालक मंडळाचा आदर सन्मान केला त्याबद्दल आभार व्यक्त केले. पुढे बोलताना सांगवे म्हणाले की अंबाजोगाई शहरात संस्थेच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या टी बी गिरवलकर इंजिनिअरिंग तसेच पॉलिटेक्निक महाविद्यालयाची मागच्या काळात झालेली वाताहत येत्या काही दिवसातच पूर्वपदावर आणण्यासाठी सर्व संचालक मंडळ प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. त्याचबरोबर संस्थेच्या अंतर्गत कलहाचा कसलाही परिणाम विद्यार्थी व त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता यांच्यावर होऊ देणार नसल्याची स्पस्ट कबुली देखील सांगवे यांनी दिली. याप्रसंगी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव व सहसचिव माधवराव पाटील आणि सुनील मिटकरी यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या. या सन्मान व सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचलन शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी केले तर आभार विनायक मुंजे यांनी व्यक्त केले. हा भवदिव्य सत्कार व सन्मान सोहळा संपन्न करण्यासाठी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रचंड परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

## मुंबई-विशाखापटणम

आरक्षण दिल्यास बारा बलुतेदारासह, घटक समाजावर मोठा अन्याय होईल. यासाठी ओबीसी आरक्षण बचावासाठी प्रा. लक्ष्मण हाके त्यांच्या वतीने गेल्या सात दिवसापासून जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे आमरण उपोषण चालू केले असून त्यांच्या या उपोषणाला आता महाराष्ट्रभरातून समर्थन मिळू लागले आहे. बुधवार दि. १९ जीवन रोजी सकाळी ९ वाजता मुंबई -विशाखापटनम या महामार्गावरती शिरूर तालुक्यातील शिंगारवाडीफाटा येथे परिसरातील ओबीसी बांधवांकडून रस्तारोको आंदोलन करण्यात आले आहे. या आंदोलनाला परिसरातील चकलांबा,तरडगव्हाण,शेकटा, शिंगारवाडी, वडाचीवाडी, तिंतरवणी, चोरपुरी, टकलेवाडी, फुलसांगवी, मार्कडवाडी आदी गावातून ओबीसी समाजातील समाजबांधवांनी आपला सहभाग नोंदवला होता. दोन तास चाललेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरती दोन्हीही बाजूला सुमारे एक ते दीड किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.यावेळी आंदोलनकर त्यांच्या वतीने विविध घोषणाबाजी करत भाषणकर्त्यांनी मनोज जरांगे सह, राज्य सरकारलाही लक्ष करून आपला रोष व्यक्त केला आहे.

## नापिकी आणि कर्जबाजारीपणाला

रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तरी परंतु, त्यांनी औषधोपचारास प्रतिसाद दिला नाही. व अखेर सोमवार, दिनांक १७ जुन रोजी उपचार सुरू असताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले. मंगळवार, दिनांक १८ जुन रोजी मयत शेतकरी लक्ष्मण दादाराव चव्हाण यांच्या पार्थिवावर नांदगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी सदर घटनेची माहिती मिळताच बर्दापूर पोलीसांनी पंचनामा केला आहे. तसेच बर्दापूर ठाण्यात घटनेची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व सून असा परिवार आहे.

## दुष्काळी अनूदानसाठी वचिंत

नंतर प्राप्त झालेली व्हि के यादी तलाठी मार्फत गावात प्रसिद्ध करूनही अद्याप काही शेतकर्यांनी के वाय सी केलेली नाही . दुष्काळ अनुदान राहिलेल्या शेतकऱ्यांनी आवश्यक ती कागदपत्र आपल्या गावचे तलाठी यांचे कडे तात्काळ जमा करावीत तसेच व्हि के यादीतील राहिलेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ के वाय सी करून घ्यावी असे आव्हान तहसीलदार जिवकुमार कांबळे व नायब तहसीलदार प्रकाश गोपड यांनी केले आहे.

## येत्या २५ जून नंतर

मत आहे. भाजपाने इतर पक्ष फोडून सरकार बनवल्याने त्यांचे अडचण झाली असे बोलले जात असून किमान आता तरी पक्षातील सक्षम नेत्यांना डावलने बंद करावे आणि त्यांना ताकद देऊन जर मैदानात उतरवले तर आगामी विधानसभेत याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. मात्र भाजपा मध्ये धुसफूस चालूच राहिली तर त्याचा मोठा फटका

बसण्याची शक्यता आहे. येत्या विधान परिषद निवडणुका आणि मंत्रिमंडळ विस्तार होईपर्यंत काही नेते शांत आहेत. नंतर मात्र भाजपाचा बडा नेता काँग्रेसमध्ये जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून असे झाले तर भाजपाची मोठी पीछेहाट होणार आहे .भाजपा लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या धक्क्यावरून सावध होईल अशी अपेक्षा असून जर पुन्हा अशीच परिस्थिती राहिली तर मग मात्र भाजपाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




# लातुरात दोनशे हेक्टरवर होणार भरडधान्यांची पेरणी

मिलेट, अर्थात पौष्टिक तृणधान्यांचा आहारातील समावेश हा आरोग्यासाठी हितकारक असून, या भरडधान्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न सुरू केले आहेत. यातूनच राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात दोनशे हेक्टरवर भरडधान्य पिकाच्या पेरणीचे नियोजन करण्यात आले असून, मंगळवारी (ता. १८) पटेल आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते लोदगा (ता. औसा) येथे पेरणीला सुरुवात करण्यात आली. या वेळी बचत गटांच्या महिलांनी भरडधान्यापासून तयार केलेल्या पदार्थांचाही आस्वादही त्यांनी घेतला.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार भारत सूर्यवंशी, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव, डॉ. शेषेराव मोहिते यांच्यासह भरडधान्य पेरणी करणारे शेतकरी उपस्थित होते. उपस्थितांचा बांबूपासून



बनविले पेन, टूथब्रश आणि टॉवेल देऊन सत्कार करण्यात आला. अभियानात लातूर, औसा आणि निलंगा तालुक्यातील शेतकऱ्यांनी भरडधान्य पेरणीसाठी तयारी दाखवली आहे. आरोग्यदायी जीवनासाठी आहारात तृणधान्याचा समावेश आवश्यक आहे. तृणधान्यात कॅल्शिअम, लोह आणि प्रथिनांचे उच्च प्रमाण असून, कमी ग्लायसेमिक इंडेक्स तसेच मुख्य आहाराच्या तुलनेत जास्त फायबरचा समावेश आहे.

तृणधान्याचे महत्त्व पटवून देण्यासोबतच जिल्ह्यात त्यांच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासह उत्पादित भरडधान्याला बाजारपेठ मिळवून देण्यात येणार आहे. लोदगा येथील फिनिक्स फाउंडेशनकडून भरडधान्याचे चांगल्या प्रतीचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

भरडधान्य पिकांसाठी कमी पाणी लागते, तसेच ८० ते ९० दिवसांत पिके घेतली जातात. जिल्ह्यातील पर्जन्यमान लक्षात घेता भरडधान्य लागवड फायदेशीर ठरणार असल्याचे पटेल यांनी या वेळी सांगितले. भरडधान्याचा आहारातील समावेश ही काळाची गरज असून ही धान्ये आरोग्यासाठी हितकारक असल्याचे सिद्ध झाले आहे.

## क्लस्टर मध्ये केळीचा समावेश कधी होणार?



केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या फलोत्पादन क्षेत्र विकास (क्लस्टर डेव्हलपमेंट) योजनेत केळी उत्पादनात जगात अग्रेसर मानल्या जाणाऱ्या जळगावचाच समावेश झालेला नाही. या क्लस्टरमध्ये केळीचा समावेश केव्हा होईल, कृषी यंत्रणा व जिल्ह्यातील नेते मंडळी त्यासाठी काय पावले उचलतील, असा मुद्दा चर्चेत आहे. अनंतपूर (आंध्र प्रदेश) आणि थेनी (तामिळनाडू) आणि राज्यातील कोल्हापूर या जिल्ह्यांचा समावेश या योजनेमध्ये आहे. जिल्ह्यातील कृषी यंत्रणा जळगावचा समावेश करण्यासंबंधी अपुऱ्या पडल्याचा मुद्दा यानिमित्त समोर आला आहे.

केळी उत्पादक आपल्या कष्टी, जिद्दी वृत्तीने काम करीत आहेत. केळीसाठी अनुकूल वातावरण जिल्ह्यात नसताना निर्यातक्षम केळीचे उत्पादन घेतले जात आहे. वादळ, अति उष्णता, अतिथंडी अशा समस्यांचा सतत सामना केळी उत्पादक करीत आहेत. केळीचे काही वाणही जिल्ह्यात निवड पद्धतीने विकसित केले आहेत. पण या शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांची शेतकरी उत्पादक कंपनी जिल्ह्यात स्थापन झालेली नाही. जिल्ह्यात अनेक शेतकरी उत्पादन कंपन्या कार्यरत आहेत. पण यातील एकही कंपनी केळीसाठी काम करीत नाही. केळीसाठी निविष्ठा, तंत्रज्ञान पुरविण्याचे काही शेतकरी कंपन्या करतात. केळीची निर्यात खासगी कंपन्या करीत आहेत. शेतकरी समूह ही निर्यात करीत नाही. केंद्राने क्लस्टरसंबंधी काम करताना शेतकरी उत्पादक कंपनीचा सहभाग अपेक्षित धरून कार्यक्रम जाहीर केला. ज्या भागात संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्या कार्यरत होत्या, त्या भागाचा समावेश पहिल्या टप्प्यात केला. जिल्ह्यात यावल, रावेर, मुक्ताईनगर, चोपडा, जामनेर या पट्ट्यात शेतकरी उत्पादक कंपनीच केळीसाठी काम करीत नसल्याने अडचण तयार झाली आणि जळगाव जिल्ह्याचा समावेश या योजनेत होऊ शकला नाही, अशी माहिती मिळाली. या योजनेस मोदी सरकारच्या सप्तवर्षपूर्तीनिमित्त या क्लस्टर विकास कार्यक्रमामुळे लाभ होऊ शकतो. त्यात संबंधित शेतकरी कंपन्या, मोठ्या शेतकरी समूहांना केळीसाठी आवश्यक कोल्ड स्टोअरेज साखळी, निर्यातक्षम उत्पादन तंत्र, काढणी पश्चात तंत्र आदींची व्यवस्था करून दिली जाईल.

काही अटी शिथिल करण्याची गरज

केळी क्लस्टरसाठी जिल्ह्यात अनुकूल वातावरण आहे. त्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता झालेली नसेल, पण शेतकरी आपापल्या भागात पूर्ण ताकदीने केळीसाठी काम करीत आहेत. यामुळे केळी क्लस्टरमध्ये काही अटी शिथिल करून जळगावचा समावेश करण्याची गरज आहे, असे जाणकार शेतकऱ्यांचे मत आहे.

## एकात्मिक उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकास योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पद्धतीस चालना देऊन शेतकर्यांच्या उत्पन्नात वाढ करन कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्य साखळीस चालना देण्यासाठी राज्य शासन तीन वर्षांसाठी विशेष कृती योजना राबवित आहे. एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकासासाठी राज्य पुरस्कृत विशेष कृती योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. ही विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबवण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालू खरीप हंगामामध्ये पुढील निविष्ठा पुरविण्यात येणार आहेत. नॅनो युरिया सोयाबीन, नॅनो डीएपी सोयाबीन, नॅनो युरिया कापूस, नॅनो डीएपी कापूस यासाठी ३० जूनपर्यंत अर्ज करावेत तर मेटाल्डीहाइड सोयाबीनसाठी २३ जून, २०२४ पर्यंत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत. या निविष्ठांचा पुरवठा करण्याकरिता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर सदर बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. बियाणे, औषधे व खते या टाईल्स अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. जास्तीत-जास्त शेतकरी बांधवांनी ारहरवलीं.ारहरीरीहींीर.सीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विभागा मार्फत करण्यात आले आहे.

## सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे शेतकरी दरवर्षी मिळवू शकतात हेक्टरी सव्वा लाख रुपये

पुणे : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांच्या आर्थिक हितसंबंधांना चालना देण्यासाठी आणि राज्यातील सौर ऊर्जा निर्मिती वाढवण्यासाठी सुरू केली आहे. या योजने अंतर्गत, शेतकरी त्यांची जमीन सरकारला भाडे तत्वावर देऊ शकतात आणि दरवर्षी हेक्टरी १.२५ लाख रुपये (तीन टक्के वार्षिक वाढीसह) मिळवू शकतात.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० ही शेतकऱ्यांसाठी एक उत्तम संधी आहे. ज्यांच्याकडे स्वत:ची सिंचन सुविधा नाही आणि ज्यांना नियमित उत्पन्नाचा स्त्रोत हवा आहे. या योजनेमुळे राज्यातील शेतकर्यांचे जीवनमान सुधारण्यास आणि राज्यात सौर ऊर्जा निर्मिती वाढवण्यास मदत होईल.



## 'कामधेनु दत्तक ग्राम' योजने अंतर्गत दुधात झाली २० टक्के वाढ!

गोंदिया : कामधेनु दत्तक ग्राम' योजना ही महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागातर्फे निवडक गावांमध्ये राबवण्यात येत आहे. ज्या गावात ही योजना राबवली जातेय तेथील दुधाचे उत्पादन वाढले असल्याचे दिसून आले आहे.

गावात दूध उत्पादनात वाढ करण्यात यावी. गाय, म्हशीपालनाला तांत्रिक जोड देऊन लसीकरणापासून जनावरे संवर्धनापर्यंतची जबाबदारी सांभाळण्याची किमया पशुसंवर्धन विभागाकडून कामधेनू दत्तक गावात करण्यात येते.

गोंदिया जिल्ह्यात कामधेनू दत्तक ग्राम योजनेतून त्या गावात पूर्वीच्या तुलनेत २० टक्के दूध उत्पादन वाढले आहे. शेतकऱ्यांच्या पारंपरिक शेतीला पूरक जोड देणारा दुग्धव्यवसाय वाढविला आहे. ३०० पैदास योग्य पशू असणाऱ्या या गावांची पशु गणना करून त्या गावांची कामधेनू दत्तक ग्राम म्हणून निवड करण्यात आली.

पशुगणना करून सर्व निकष पूर्ण करणाऱ्या गावाला कामधेनू दत्तकग्राम म्हणून पशुसंवर्धन विभाग स्वीकारते. ज्या गावाला दत्तक घेतले, त्या गावातील सर्व जनावरांचे लसीकरण, दुग्ध



उत्पादन किती आहे; दूध उत्पादन वाढविण्यासाठी काय करता येईल, जनावरांची औषधे, खनिजद्रव्ये, जंतनाशक औषधे, गोचीड, शेतकऱ्यांची सहल नेणे, नाविन्यपूर्ण उपक्रम, संकरित वासरांचा मेळावा घेऊन त्यांना बक्षीस देणे, वैरण विकासासाठी प्रयत्न करणे, जनावरांच्या विस्तारासाठी कार्यक्रम घेणे, गोठा स्वच्छ करणे, चाऱ्याचे व खतांचे व्यवस्थापन करण्यात येते. या दत्तक गावाला वर्षासाठी १ लाख ५२ हजार रुपये त्या गावाला जनावरांच्या संवर्धनासाठी देण्यात येतात. गावातील सर्वाधिक पशु मालकाला पशुमालक मंडळाच्या अध्यक्षपदी निवड केली जाते. तसेच त्या मंडळाची 'आत्मा' या संस्थेत नोंदणी केली जाते. शेतकर्यांचा व पशुमालकांचा आर्थिक विकास कसा होईल, यावर यातून चर्चा घडवून आणली जाते.

अधिकाऱ्यांचा रात्री मुक्काम

कामधेनू गावातील शेतकऱ्यांना व पशु मालकांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. कांतीलाल पटले व त्यांचे इतर अधिकारी त्या गावात एक दिवस रात्रीचा मुक्काम ठोकतात.

त्यावेळी शेतकर्यांशी संवाद साधून त्यांना दूध उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ कशी करता येईल, यावर मार्गदर्शन करतात. कामधेनू गावात पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे डॉ. पटले यांनी सांगितले.




### जागतिक दिवस
### आंतरराष्ट्रीय योग दिन
### जागतिक संगीत दिन

### महत्वाच्या घटना

१६७४ : कवीभूषण यांनी '' शिवराय भूषण '' हे काव्य पूर्ण केले.
१७८८ : न्यू हॅम्पशायर अमेरिकेचे ९ वे राज्य बनले.
१८९८ : अमेरिकेने स्पेनकडून 'ग्वाम' हा प्रांत ताब्यात घेतला.
१९४८ : पहिले भारतीय गव्हर्नर जनरल म्हणून चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्याकडे सूत्रे
१९४९ : राजस्थान उच्च न्यायालयाची स्थापना
१९५७ : एलेन फेअरक्लो यांनी कॅनडाच्या पहिल्या महिला कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली.
१९६१ : अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी समुद्राच्या खार्या पाण्याचे गोड्या पाण्यात रुपांतर करणारे यंत्र विकसित केले.
१९७५ : वेस्ट इंडीजने पहिला क्रिकेट विश्वचषक जिंकला.
१९८९ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने देशाचा ध्वज जाळण्याची कृती आणि वाचा स्वातंत्र्याची अभिव्यक्ती असल्यामुळे वैध ठरवली.
१९९१ : भारताचे ९ वे पंतप्रधान म्हणून पी. व्ही. नरसिंह राव यांनी सूत्रे हाती घेतली.
१९९२ : विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाजविज्ञानाच्या क्षेत्रात विशेष कार्य करणार्या डॉ. रघुनाथ माशेलकर यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पारितोषिक जाहीर
१९९५ : पर्यावरणक्षेत्रात विशेष कार्य केल्याबद्दल पर्यावरणतज्ञ रश्मी मयूर यांना अमेरिकेतील 'द युनिटी इन योग इंटरनॅशनल' या संस्थेने विशेष सन्मान जाहीर केला.
१९९८ : फ्रँकफर्ट बुद्धीबळ महोत्सवात विश्वनाथन आनंदने 'फ्रिट्झ-५' या संगणकाचा सहज पराभव केला.
१९९९ : विश्वकरंडक स्पर्धेत १००० धावा पूर्ण करणारा मार्क वॉ (ऑस्ट्रेलिया) हा चौथा खेळाडू ठरला.
२००९ : भारताची बॅडमिंटन स्टार सायना नेहवाल सुपर सिरीज बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली.
२००४ : स्पेसशिपवन या पहिल्या खाजगी अंतराळयानाचे पहिले उड्डाण.
२००६ : नवीनच शोध लागलेल्या प्लूटोच्या उपग्रहांचे 'निक्स' व 'हायड्रा' असे नामकरण करण्यात आले.
२०१५ : जागतिक योग दिनाची पराक्रमी सुरवात.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८१ : फ्रेंच गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ सिमिओन-डेनिसपॉइसॉन यांचा जन्म.
१९०५ : जेआँ-पॉल सार्त्र फ्रेन्च लेखक, कवी, तत्त्वज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: १५ एप्रिल १९८०)
१९१२ : भारतीय लेखक व नाटककार विष्णू प्रभाकर यांचा जन्म.(मृत्यू: ११ एप्रिल २००९)
१९१६ : सुरेन्द्रनाथ कोहली भारताचे ९ वे नौदल प्रमुख (मृत्यू: २१ जानेवारी १९९८)
१९२३ : सदानंद रेगे, मराठी कवी, कथाकार आणि अनुवादक.
१९४१ : भारतीय बिशप अलॉयसियस पॉल डिसोझा यांचा जन्म.
१९५२ : जेरमी कोनी न्यूझीलंडचा क्रिकेटपटू
१९५३ : बेनझीर भूट्टो पाकिस्तानच्या पंतप्रधान (मृत्यू: २७ डिसेंबर २००७)
१९५८ : भारतीय अभिनेत्री रीमा लागू यांचा जन्म. (मृत्यू: १८ मे २०१७)
१९६७ : ईबे चे स्थापक पियरे ओमिदार यांचा जन्म.
१९६७ : थायलंड देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान यिंगलक शिनावात्रा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७४ : स्वीडीश भौतिकशास्त्रज्ञ अँडर्सयोनास अँग्स्ट्रॉम यांचे निधन.
१८९३ : अमेरिकन उद्योगपती तसेच स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीचे संस्थापक लिलँड स्टॅनफोर्ड यांचे निधन.
१९२८ : द्वारकानाथ माधव पितळे तथा नाथमाधव, मराठी कादंबरीकार. (जन्म: ३ एप्रिल १८८२)
१९३२ : आधुनिक काळातील सर्वश्रेष्ठ ब्रजभाषा कवि जगन्नाथदास रत्नाकर यांचे निधन.
१९४० : डॉ. केशव बळीराम हेडगेवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक व पहिले अध्यक्ष (जन्म: १ एप्रिल १८८९)
१९५७ : नोबल पारितोषिक विजेता जर्मन भौतिकशास्त्रज्ञ जोहन्नेस स्टार्क यांचे निधन.
१९७० : सुकार्नो इंडोनेशियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ६ जून १९०१)
१९८४ : अरुण सरनाईक, महाराष्ट्रीयन मराठी चित्रपट अभिनेता व गायक. (जन्म: ४ ऑक्टोबर १९३५)
२००३ : लिऑन युरिस अमेरिकन कादंबरीकार (जन्म: ३ ऑगस्ट १९२४)
२०१२ : महाराष्ट्रीयन मराठी लेखक व अनुवादक तसचं, 'सह्याद्री' वृत्तपत्राचे संपादक भालचंद्र दत्तात्रय खेर यांचे निधन. (जन्म: १२ जून १९१७)
२०१२ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय अर्थशास्त्रज्ञ, नागरी सेवक अधिकारी आणि मुत्सद्दी तसचं, अमेरिकेतील भारताचे माजी राजदूत व माजी नियोजन आयोगाचे सदस्य आबिद हुसेन यांचे निधन.
२०१२ : भारतीय छायाचित्रकार आणि पत्रकार सुनील जना यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १९१८)
२०२० : जीत सिंग नेगी (आधुनिक घरवल लोकसंगीताचे जनक, जन्म: २ फेब्रुवारी १९२५).

# मध्यान्ह भोजनात १५ आरोग्यदायी पदार्थांचा समावेश फक्त कागदावरच

## मोफत गणवेश मिळणार कधी?: डॉ.गणेश ढवळे






लिंबागणेश । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या १५ पाककृती निश्चित करण्यात आल्या असुन ३ संरचित आहार पद्धती नुसार व्हेजिटेबल पुलाव, नाचणी सत्त्व,अंडा पुलाव,तांदळाची खिचडी अशा पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची खिचडीपासुन सुटका होणार असुन निश्चित केलेल्या पाककृती मध्ये व्हेजिटेबल पुलाव,अंडा पुलाव,मसाले भात,मोड आलेली मटकीची उसळ, मटार पुलाव,गोड खिचडी,मुगडाळ, खिचडी,चवळी खिचडी,मुग,शेवगा,वरण भात,तांदळाची खीर,चणा पुलाव, नाचणीचे सत्त्व, सोयाबीन पुलाव,मोड आलेले कडधान्य आदी.१५ पदार्थांचा आस्वाद घेता येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे मात्र वस्तुस्थिती वेगळीच असुन सद्यस्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीच्या स्वरूपात पोषण आहार दिला जात आहे. शालेय पोषण आहार पुरवठादार महाग वस्तुंची कमतरता दाखवून स्वस्त असणा-या मटकी, हरभरा,वाटाणा, मसुर,मुगदाळ यांचाच शाळांना पुरवठा करण्यात येत आहे.केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करून आहाराचा दर्जा आणि पौष्टिकता वाढविणे, आहारात वैविध्य आणण्यासाठी पाककृती सुधारणा समिति नियुक्त करण्यात आली होती.

शिक्षण विभागाकडून पात्र शाळांमध्ये निर्माण केल्या जात असलेल्या परसबागातुन उत्पादीत भाजीपाला,फळे यांचा समावेश विद्यार्थ्यांच्या आहारात होत असल्याने विद्यार्थ्यांना ताजा,सकस आहार मिळण्यास मदत होत असल्याचे नमूद केले आहे. मात्र जिल्ह्यातील किती शाळांमध्ये परसबाग आहे आणि मुख्य म्हणजे उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना प्यायला पाणी नाही आणि परसबाग कशी जगवायची असा प्रश्न शाळेतील शिक्षकांनी उपस्थित केला असुन केवळ कागदावर छान असणारी योजना वास्तवात मात्र उतरताना दिसत नाही. राज्यात'' एक राज्य एक गणवेश'' योजनेची अंमलबजावणी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येत असून या अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित स्वरुपाचा गणवेश तर स्काऊट व गाईड या विषयासाठी दुसरा गणवेश असणार आहे.महिला आर्थिक विकास महामंडळाकडून गणवेशाच्या शिलाईचे काम सुरू असुन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येत असली तरी नेमका गणवेश मिळणार कधी?? हा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे.गणवेशा बरोबरच मुलांना बुट आणि सॉक्स सुद्धा मिळाले नाहीत.गतवर्षी एका विद्यार्थ्यांसाठी एक बुट जोडी आणि दोन सॉक्स जोड यासाठी १७० रूपये निधी देण्यात आला होता.यावरुन कोणत्या दर्जाचे साहित्य मिळत असेल याची कल्पनाच न केलेली बरी.

# तीन नवीन कायद्यांबाबत माहितीयुक्त शिबीर सत्रे

बीड । प्रतिनिधी

दिनांक १२ जून २०२४ रोजीच्या महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुसार व मा.श्री आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यातर्फे सर्व विधी दुत, लोक अभिरक्षक टीम, पॅनल अधिवक्ते, बीड जिल्हयातील संपूर्ण न्यायाधीश वर्ग, पोलीस वर्ग, जिल्हा वकील संघ, बीड या सर्व घटकांसाठी भारतीय न्याय संहिता, भारतीय साक्ष संहिता व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता या सर्व २०२३ च्या नवीन कायद्यांच्या तरतुदींचे संक्षिप्तरित्या मार्गदर्शन शिबीरे वेगवेगळया तारखांना आयोजित करण्यात आले होते.

सदरील तिन्ही कायदे हे दिनांक ०१ जुलै २०२४ पासून अंमलात येणार असल्याचे गजानन सोनी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांनी सांगितले. भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या हिट अँड रन ची कलम १०६(२) हि तरतूद वगळता तिन्ही कायदे संपूर्ण रित्या अंमलबजावणी होण्यापूर्वी सर्व घटकांना समजेल अशा सोप्या भाषेत फौजदारी कायद्यांची माहितीयुक्त शिबीर घेतल्याचे ही त्यांनी सांगितले. या शिबिरांसाठी मार्गदर्शक म्हणून वैभव जोशी, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बीड, एस.बी. गणप्पा, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, तालुका परळी वैजनाथ, विशाखा सहारे पाटील, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बीड, एन.एन. साबळे, ज्येष्ठ विधिज्ञ, बीड यांनी महत्वाची भूमिका बजावली. प्रत्येक विषयाच्या खोलात जाऊन कोणते बदल कायद्यात आले आहे, नवीन कायद्यात ऑनलाईन फिर्याद देता येणार असेही ते म्हटले. त्यावर तीन दिवसात संबंधित अधिकार क्षेत्र असलेल्या पोलीस ठाण्यात जाऊन स्वाक्षरी करावी लागणार. जसा काळ बदलत जातो तसा कायदाही आपले स्वरूप बदलतो. नवीन कायद्यातील तरतुदी सोप्या भाषेत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. तिन्ही नवीन कायदे हे सशक्त भारताचे प्रतिनिधित्व करणार असल्याचे व कामात पारदर्शकता वाढविणारे असल्याचे माहिती त्यांनी दिली. सदरील माहिती तालुक्याच्या व्यक्तीपर्यंत आभासी पद्धतीने पोहोचविल्याचे सांगितले.

# हाके यांच्या आंदोलनाविषयी सरकारने भूमिका जाहीरपणे स्पष्ट करावी

## पंकजा मुंडे यांची सरकारकडे पत्राद्वारे मागणी

## मुख्यमंत्री व दोन्ही उप मुख्यमंत्र्यांनी उपोषणाला भेट द्यावी

बीड । प्रतिनिधी

ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलना विषयी राज्य सरकारने आपली भूमिका जाहीरपणे स्पष्ट करावी अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी सरकारकडे एका पत्राद्वारे केली आहे. हाके यांच्या उपोषणाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी भेट देऊन त्यांचं म्हणण ऐकून घ्यावं, ही भेटही तेवढीच महत्वाची आहे, असं त्यांनी या तिघांनाही पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे.

पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे की, ओबीसी आरक्षणा संदर्भात प्रा. लक्ष्मण हाके व त्यांचे सहकारी वडीगोद्री जि. जालना येथे गेल्या सात दिवसांपासून आमरण उपोषणास बसले आहेत, त्यांच्या पोटात अन्नाचा कणही नाही, त्यांनी पाणी देखील बंद केले आहे. शासनाची भूमिका ही सर्व आंदोलनांना सारखीच असली पाहिजे. श्री हाके यांच्याबाबत प्रमुख मंत्र्यानी तसेच आपण स्वतः गांभिर्याने लक्ष तर द्यावेच याशिवाय उपोषणास भेट देऊन सन्मान द्यावा, त्यांचं म्हणणं ऐकून घ्यावं. ते अत्यंत संयमाने आणि सर्वांना सन्मानाने वागवत आहेत हे कौतुकास्पद आहे. त्यांचं आणि सर्व ओबीसी नेत्यांचं आवाहन देखील सकारात्मकच आहे. ''कोणीही कुठल्याही प्रकारे नकारात्मक गोष्टी करू नयेत, कुठल्याही प्रकारची हिंसा करू नये'' असंच आवाहन ते करत आहेत म्हणजे व्यवस्थेचा सन्मानच करत आहेत. म्हणूनच त्यांच्याकडे तात्काळ लक्ष देणं तेवढंच महत्वाचं आहे. इथे प्रश्न समान न्यायाचा आहे, म्हणणे ऐकून कायद्याने निर्णय घ्यावा अशी आवश्यकता आहे. आपण व दोन्ही उप मुख्यमंत्र्यांनी सरकारच्या वतीने या आंदोलना विषयीची आपली भूमिका जाहीर स्पष्ट करावी व तिथे भेट द्यावी अशी आपणास माझी विनंती आहे.

# राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावे

बीड । प्रतिनिधी

दि.१८ जून २०२४ रोजी (छत्रपती संभाजीनगर) देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती या योजनेसाठी सन २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांकडून जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आले आहेत. नजीकच्या काळात योजनेंतर्गत पालकांच्या कुटुंबाच्या उत्पन्न मर्यादेत तसेच जागांमध्ये वाढ झाल्यास त्यानुसार जाहिरातीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे, सुधारणा करण्याचे व फेर अर्ज मागविण्याचे अधिकार शासन राखून ठेवत आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

खालील नमूद वेबसाईटवरून अर्ज डाऊनलोड करून तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक १२ जुलै २०२४ रोजी सायं.६.१५ वाजेपर्यंत पोस्टाने किंवा समक्ष समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड पुणे- ४११००१ येथे सादर करावेत.योजनेच्या प्रमुख अटी व शर्ती महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि पी.एच.डी.साठी अद्ययावत २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील नोकरी असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. सदर योजनेचा लाभ एका कुटुंबातील एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त मुलांना हि शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही. अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी (जलद दुवे-रोजगार) या संकेत स्थळाला भेट द्यावी. सदर योजनेच्या सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दिनांक ३०.१०.२०२३ व दि.९.११.२०२३ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार तसेच नियोजन विभागाचा शासन निर्णय दि.२०.०७.२०२३ मधील अटी व शर्ती लागू राहतील.सदर शिष्यवृत्तीसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत असे आवाहन, समाज कल्याणचे आयुक्त ओमप्रकाश बकोरीया आणि प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.अर्ज करण्याचा अंतिम वेळ व दिनांक १२ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत

# शहरातील वाढत्या चोरीकडे पोलीसांनी वेळीच आळा घालावा




बीड । प्रतिनिधी

बीड शहर परिसरात गेल्या काही महिन्यात चोरट्यांनी चांगलाच धुमाकुळ घातला आहे या वाढत्या चोर्यांचा आलेख हा बीड शहराची प्रतिमा मलीन करणारा आहे त्याकडे पोलीस प्रशासन देखील काटेकोरपणे लक्ष देत नाही त्यामुळे शहरातील वाढत्या चोरीकडे पोलीसांनी वेळीच लक्ष घालावे जर कुठलाही चोर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती लागला तर त्याला धडा शिकवू असा इशारा पत्रकाद्वारे जिल्हा सचिव सोमेश कदम, शहराध्यक्ष करण लोंढे यांनी दिला आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड शहरात गेल्या ६ ते ८ महिन्यांपासून चोरट्यांनी चांगलाच धुमाकुळ घातला असून कधी महिलांचे रस्त्यावर दुचाकीवरुन गंठन चोरणे, तर कधी बस स्थानक परिसरात गोर गरीबाचे पाकीट मारणे तसेच कधी शाळेच्या किंवा क्लासेसच्या दारातून सायकल चोरी जाणे किंवा गाडी चोरणे तसेच कधी कोणाचे घर फोडणे असे प्रकार घडू लागले आहेत त्यामुळे शहरातील वाढत्या चोरीकडे पोलीसांनी वेळीच लक्ष घालावे अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करु व कुठलाही चोर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती लागला तर त्याला धडा शिकवू असे पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# आदित्यच्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कंपन्यामध्ये निवड




आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना इनप्लांट ट्रेनिंगचे प्रशिक्षण पूर्ण झाल्या नंतर लगेचच नोकरीची संधी मिळाली. बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांना घडवणारी संस्था म्हणून नावारुपाला आलेली आहे. येथील अनेक विद्यार्थी मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. या इनप्लांट ट्रेनिंगमध्ये १३ विद्यार्थ्यांची विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड करण्यात आली. त्यामध्ये देशमुख गणेश (आय.टी.सी.फुड्स लि.), रजनीश वंजारी (हल्दीराम इंटरनॅशनल प्रा.लि.), मोरे केतन (आय.टी.सी.फुड्स लि.), शिवम देवकर (वेकफिल्ड फुड्स प्रा.लि.), वाघमोडे तात्या (बिसलेरी इंटरनॅशनल प्रा.लि.), प्रतिक थोरात (वेकफिल्ड फुड्स प्रा.लि.), मांटे धनंजय (प्रेरणा बेवरेज प्रा.लि.), दाते प्रांजल (वेकफिल्ड फुड्स प्रा.लि.), लिंबाळकर राम (आय.टी.सी.फुड्स लि.), पुलाटे मयंक (फ्रीगोरिफिको अल्लाना प्रा.लि.), माळी सिद्धमलप्पा (ईशा फुडस प्रा.लि.), जाधव अरुण (आय.टी.सी.फुड्स लि.), ईलग अनिकेत (प्रेरणा बेवरेज प्रा.लि.), यांची या नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. बीडच्या आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळत असल्यामुळे तेथील विद्यार्थी पुढे जावून चांगल्या पदावर दिसतात.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांची वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी परिषद सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका आदरणीय डॉ. आदितीजी सारडा मॅडम तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी शुभेच्छा दिल्या.

यासाठी उप. प्रा. सोळंके ए. यु , ट्रेनिंग व प्लेसमेंट इन्चार्ज प्रा.गुजर जी.एम , प्रा. राठोड पी.एस, प्रा. पुंडे एम. ए. यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शेतकरी बंधूनी डिएपी खतास पर्यायी खते वापरावीत

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सद्या पेरणीला सुरुवात झाली असून डिएपी खताची शेक-यांकडून जास्त मागणी आहे. डिएपी खता मध्ये १८ ट्क्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ ट्क्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टिएसपी या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे.चालू खरिप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन, कृषी विभागाकडून सर्व शेतक-यानां करण्यात आले आहे.

# शासकीय वसतीगृहासाठी इच्छुक इमारत मालकांनी संपर्क साधावा

बीड । प्रतिनिधी

सामाजिक न्याय विभागाच्या निर्णय दिनांक १५ जून २०२१ व दिनांक १० जानेवारी २०१९ उसतोड कामगारांच्या मुला मुलींसाठी बीड जिल्ह्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी प्रत्येकी दोन असे १०० विद्यार्थी क्षमतेची वस्तीगृहे सुरू करण्यास मंजुरी दिलेली असून सदर वस्तीगृह भाडे तत्त्वावरील मराठीमध्ये सुरू करण्यासाठी खाली नमूद केलेल्या इमारतीच्या आवश्यकता आहे. धारूर, वडवणी,केज परळी वैजनाथ, आष्टी आणि शिरूर कासार या ठिकाणी मुलींचे वस्तीगृह सुरू करण्यासाठी व अंबाजोगाई येथे मुलांचे शासकीय वस्तीगृह सुरू करण्यासाठी खाली नमूद तपशिलाप्रमाणे भाडे तत्त्वावरील इमारतीची आवश्यकता आहे.

निवासी खोल्या - १६ किमान ३१० चौरस फूट प्रति खोली, शौचालय १०, स्नानगृह १० कार्यालयासाठी १ खोली स्वयंपाक गृहासाठी २ खोल्या भांडार, गृहासाठी १ खोली भोजन कक्षासाठी १ खोली किमान १५०० चौरस फूट, मनोरंजन कक्ष १ हॉल, वाचनालय १ खोली संगणक कक्षासाठी १ खोली, गृहपाल निवास ३ खोल्या, मोकळी जागा सायकल ठेवण्यासाठी व इतर कामासाठी अशा ३७ खोल्या त्यामध्ये कायमस्वरूपी पाण्याची पुरेशी साठवणुकीची व्यवस्था, सुस्थितीत असलेली इमारत, पुरेशी विद्युत व लाईट व्यवस्था, इमारतीचा परिसर विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य हवेशीर असणे आवश्यक आहे. इमारतीस जोडणारा रस्ता निधोक असावा. इमारतीचे क्षेत्रफळ मोकळ्या जागेसह प्रति विद्यार्थी १०० चौरस फूट असावे. त्याअनुषंगाने किमान १०००० हजार चौरस फूट बांधकाम (मोकळ्या जागेसह) असलेल्या धारूर, वडवणी, केज, परळी वैजनाथ, आष्टी, शिरूर कासार व अंबाजोगाई येथील इच्छुक इमारत मालकांनी तात्काळ सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड येथे कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव दिनांक ३० जून २०२४ पर्यंत सादर करावेत.असे समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बीड यांनी कळविले आहे.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१६५/२०२४**
**रमेश श्रीहरी भोरे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, पालसिंगन ता. जि. बीड**

**पहा रमेश श्रीहरी भोरे रा. पालसिंगण ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत तुकाराम दादा भोरे** यांचा दिनांक २२/०६/१९१९ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास पालसिंगन ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे पालसिंगन ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २०/०६/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०७/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** | स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१६५/२०२४**
**बाबासाहेब लक्ष्मण उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**

**पहा बाबासाहेब लक्ष्मण उबाळे रा. चऱ्हाटा ता. जि. बीड ह.मु. संत नामदेवनगर बीड,** उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत खंडू यदू उबाळे** यांचा दिनांक ०४/०२/१९०२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २०/०६/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०७/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** | स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१६७/२०२४**
**युवराज धर्मराज उबाळे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, चऱ्हाटा ता. जि. बीड**

**पहा युवराज धर्मराज उबाळे रा. चऱ्हाटा ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत यशवंत भगवानराव उबाळे** यांचा दिनांक ०२/०७/१९१७ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २०/०६/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०७/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** | स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

# येत्या २५ जूननंतर महाराष्ट्रात राजकीय भूकंप होणार

## भाजपाचा बडा नेता काँग्रेसमध्ये जाण्याची शक्यता

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपाला मोठा फटका बसला आहे .याची भरपाई करण्याची तयारी सर्वात पक्षाकडून होत असली तरी भाजपाचा एक बडा नेता मात्र येत्या पाच जून नंतर काँग्रेसमध्ये जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून विधान परिषदेच्या निवडणुका आणि मंत्रिमंडळाचा विस्तार होईपर्यंत ही भूकंप पूर्वीची शांतता असणार आहे. महाराष्ट्रामध्ये गेल्या तीन वर्षांमध्ये जे प्रयोग झाले याचा मोठा फटका भाजपाला लोकसभा निवडणुकीत बसला असून मराठवाड्यामध्ये काही प्रमाणात जरांगे फॅक्टरही भाजपाच्या अडचणीचा ठरला आहे. बीड आणि परभणीचे उमेदवार तसेच जालन्याचे उमेदवार यांना मोठा फटका बसल्याचे बोलले जात आहे. भाजपाला काही नेत्यांचे पुनर्वसन करणे गरजेचे असून आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये ज्यांचा अनेक जिल्ह्यांमध्ये प्रभाव आहे. त्यांना डावलने विधानसभेला अडचणीचे ठरणार आहे. अनेक नेत्यांमध्ये सध्या अस्वस्थता असून येत्या काही दिवसात विधान परिषदेच्या जागांसाठी निवडणूका होणार आहेत. लोकसभेत पडलेल्या उमेदवारांचे पुनर्वसन झाले नाही तर आणि मंत्रिमंडळ विस्तारात त्यांची वर्णी लागली नाही तर या विस्तारानंतर महाराष्ट्रात मोठा राजकीय भूकंप होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. भाजपचा एक बडा नेता ज्याचा पाच-सहा जिल्ह्यामध्ये प्रभाव आहे. असा नेता काँग्रेसमध्ये जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. असे झाले तर येत्या विधानसभा निवडणुकीत भाजपाची मोठी अडचण होणार असून काँग्रेसला याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. काँग्रेसला मोठ्या प्रमाणात बळ मिळाले तर त्यांच्या जागा वाढून पुन्हा महाराष्ट्रात काँग्रेस सक्षम होणार आहे. अशा परिस्थितीत भाजपाने प्रयोग करणे थांबून नेत्यांना बळ दिले तर आगामी काळात भाजपाला फायदा मिळणार आहे. मागील अडीच तीन वर्षांमध्ये भाजपाने महाराष्ट्राचे प्रयोग केले ते प्रयोग भाजपाला अडचणी जाणारे ठरले असून भाजपा पाच वर्ष शांत राहिला असता तर काही न करता भाजपाच्या जागा ३० च्या पुढे गेल्या असत्या असे जानकाराचे पान ३ वर

### ही तर समर्थकांची मागणी

भाजपच्या या नेत्याने राष्ट्रीय कोअर कमिटीचे सदस्य असतानाही स्वत:साठी कुठलीही मागणी केलेली नाही .कुठल्याही पदावर मला घ्या अशी कसलीच मागणी केलेली नाही. मात्र समर्थकांची अनेक दिवसापासून त्यांना राज्यसभेवर किंवा विधान परिषदेवर घ्यावे आणि त्यानंतर मंत्रिमंडळ समावेश करावा अशी सातत्याने मागणी आहे.

### तर काँग्रेसला मोठा फायदा

जर महाराष्ट्रातील भाजपाचा बडा नेता काँग्रेसमध्ये गेला तर किमान पाच-सहा जिल्ह्यामध्ये काँग्रेसला विधानसभा निवडणुकीमध्ये मोठा फायदा होणार असून काँग्रेस भविष्यात नंबर एकचा पक्षही होऊ शकतो अशी परिस्थिती निर्माण होईल

### नेत्याचा पाच-सहा जिल्ह्यात प्रभाव

भाजपाच्या या बड्या नेत्याचा पाच ते सहा जिल्ह्यांमध्ये प्रभाव असून विधानसभा निवडणुकीमध्ये या पाच-सहा जिल्ह्यामध्ये भाजपाला फटका बसला तर भाजपाची मोठी पिछेहाट होणार असून या नेत्याला बळ देणे ही भाजपाची गरज असल्याचे बोलले जात आहे.

## नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून नांदगाव येथे शेतकऱ्याची आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी



शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र संपायचे नांव घेत नाही. दररोज राज्यात बळीराजा मृत्यूला कवटाळत आहे. असाच एक दुर्दैवी प्रकार तालुक्यातील नांदगाव येथे घडला आहे. सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून तालुक्यातील नांदगाव येथील लक्ष्मण दादाराव चव्हाण (वय ५८ वर्षे) या शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना रविवार, दिनांक १६ जुन रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी बर्दापूर पोलीसांनी पंचनामा केला असल्याचे समजते.

अंबाजोगाई तालुक्यातील मौजे नांदगाव येथील शेतकरी लक्ष्मण दादाराव चव्हाण (वय ५८ वर्षे) यांना अंदाजे चार एकर जमीन आहे. चव्हाण हे शेती करूनच आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. मात्र, सततच्या नापिकीमुळे फारसे उत्पादन निघत नव्हते. त्यामुळे ते नैराश्यात गेले होते. तर दुसरीकडे बँकेकडून घेतलेल्या पीक कर्जाचा डोंगर ही वाढत चालला होता. शेतीतून उत्पादनच निघत नसल्याने बँकेकडून घेतलेले पीक कर्ज फेडायचे कसे ? याच विवंचनेत ते नेहमी असायचे. दरम्यान, रविवार, दिनांक १६ जुन रोजी सकाळी १० वजण्याच्या सुमारास ते बाहेर जाऊन येतो असे सांगून घराबाहेर पडले असता, ते परत आलेच नाही. यानंतर कुटुंबियांनी आधी त्यांचा गावात शोध घेतला. परंतु, ते मिळून आले नाहीत. म्हणून अखेर शेतात शोधले असता ते अत्यवस्थ अवस्थेत पडलेले आढळून आले. त्यांनी विषारी औषध प्राशन केले आहे असे लक्षात येताच नातेवाईकांनी त्यांना तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी पान ३ वर

## काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांच्यावर आता तीन राज्याची जबाबदारी !

**केज । प्रतिनिधी**

काँग्रेसच्या खासदार तथा ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई अशोकराव पाटील यांच्यावर पक्षाने पुन्हा एक मोठी जबाबदारी दिली असून रजनीताई यांचेकडे आता तीन राज्यांची जबाबदारी देण्यात आली असून पक्षाने प्रसिद्ध केलेल्या या यादीनुसार त्यांचेवर इतरांपेक्षा मोठी अर्थात तीन राज्यांची जबाबदारी असणाऱ्या त्या एकमेव नेत्या आहेत.



गांधी घराण्याशी असलेली निष्ठा व पक्षातील एक विश्वासू नेत्या म्हणून नेहमीच त्यांच्यावर मोठी जबाबदारी पक्षाने सोपवलेली आहे व ताईंनी देखील तेवढ्याच जबाबदारीने पक्षाचे काम केलेले आहे. यावेळी त्यांच्याकडे दिल्ली, उत्तराखंड व हिमाचल प्रदेश या तीन राज्याच्या लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची कारणे शोधण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाने त्यांच्यावर सर्वात मोठी जबाबदारी दिली असून तीन राज्याची जबाबदारी असलेल्या त्या एकमेव नेत्या आहेत. संसद पटू म्हणून राज्यसभा गाजवणाऱ्या सरकारला धारेवर धरणाऱ्या काँग्रेसच्या प्रभावी महिला नेत्या म्हणून त्यांचे नाव आहे. यापूर्वीही ज्या राज्यांची जबाबदारी त्यांच्यावरती दिली त्यांनी ती यशस्वीपणे पार पाडली आहे. पक्षाने त्यांच्यावर दिलेली जबाबदारी त्या सक्षमपणे पार पडतील

आजपर्यंत पक्षाने माझ्यावर दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या मी सक्षमपणे निभावल्या आहेत. आज पुन्हा काँग्रेस पक्षाने माझ्यावर मोठी जबाबदारी दिलेली आहे. तीनही राज्यात सर्वत्र फिरून यावरती विचार मंथन केले जाईल व या राज्यात काँग्रेसला का पराभवाचा सामना करावा लागला याची उत्तर शोधून ती आम्ही पक्षाकडे व आमच्या नेतृत्वाकडे देऊ आणि निश्चितपणे आगामी काळात काँग्रेस पक्ष देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे येईल यात शंका नाही. - रजनीताई पाटील

## अंबाजोगाईतील कलश नितीन मंत्री यांचे शिक्षणात अभूतपूर्व यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी



अंबाजोगाई येथील साध्या कुटुंबातील कलश नितीन मंत्री यांनी आपल्या शिक्षणात अभूतपूर्व यश मिळवले आहे. न्यू व्हिजन पब्लिक स्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या कलश यांनी परीक्षेत ६४७ गुण मिळवले आहेत. त्याचप्रमाणे, जेईई परीक्षेत ९५.२५ पर्सेंटाइल आणि महाराष्ट्र सीईटी परीक्षेत ९९.९ पर्सेंटाइल मिळवले आहेत. १२ वी बोर्ड परीक्षेत त्यांनी ८९.१७% गुण मिळवले असून ते इंस्पायर (□८०,०००)शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. विद्या आराधना अकॅडमी, लातूर आणि वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर येथे शिक्षण घेतलेल्या कलश यांच्या या यशामुळे मंत्री कुटुंब आणि संपूर्ण अंबाजोगाई शहर गर्वाने भरून गेले आहे.

कलश यांची मेहनत आणि चिकाटी अखेर फळाला आली आहे. त्यांनी अपार मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामध्ये कुटुंबाच्या पाठिंब्याचा देखील मोठा वाटा आहे. आपल्या अभ्यासातील एकाग्रता आणि धडपडीमुळे त्यांनी हे सर्व उच्चांकी गुण प्राप्त केले आहेत. त्यांच्या या यशामुळे विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणादायी ठरले आहेत.

### आजाराला कंटाळून विवाहित महिलेची आत्महत्या

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या माळेवाडी ता बीड येथील दगाबाई बाबासाहेब आटुळे वय पन्नास या विवाहित महिलेने आपल्या शेतात मधील विहिरीत उडी घेऊन आत्माहत्या केल्याची घटना दिनांक १९/६/२४. च्या पहाटे घडली सदर प्रकरणी माहिती अशी कि माळेवाडी येथील बाबासाहेब आटुळेयांची पत्नी दगाबाई ही सतत आजारी होती आजारपणाला कंटाळून त्याच नैराश्यातून तिने आपल्या गावा जवळच्या शेतात मधील असलेल्या विहिरीत उडी मारून आपली जीवन यात्रा संपवलली सदर महिला अत्यंत मनमिळाऊ होती तिला मुलबाळ नसल्याने त्याच नैराश्यातून तिने आत्महत्या केल्याचे चर्चा नागरिक करतात तिच्या मृत्यू बद्दल गावात हळहळ व्यक्त केली जाते.

## दुष्काळी अनूदानसाठी वचिंत असलेल्या शेतकऱ्यानी तात्काळ केवायसी करण्याचे तहसील कार्यालयाचे आवाहन

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

२०२३ चे खरीप हंगामात गंभीर दुष्काळ पडल्याने शेतक-याचे मोठे नुकसान झाले होते शासनाने या शेतक-याना नुकसान भरपाई म्हणूण दुष्काळी अनूदान जाहीर केले के वाय सी न केल्याने व इतर कागदपत्र न दिल्याने धारुर तालूक्यातील ४९९५ शेतकरी अद्याप या अनूदाना पासून वंचित आहेत त्यांनी तात्काळ प्रक्रिया पुर्ण करावी असे अवाहण तहसीलदार जिवकुमार कांबळे यांनी केले आहे

खरीप हंगाम २०२३ दुष्काळ मध्ये पडलेल्या गंभिर दुष्काळा मुळे शेतक-याची पुर्ण पिके हातची गेली होती शेतकरी हतबल झाला होता मात्र राज्य शासनाने दुष्काळी अनूदान देण्याची घोषणा केली होती हे अनुदान तात्काळ वाटप करण्याचे सुचना मागील दोन महीण्या पासून होत्या धारूर तालूक्यात तहसील कार्यालयाने तत्परतेने कारवाई करून अंतिम बाधित शेतकरी संख्या ३५९४१ या मध्ये अपलोड शेतकरी संख्या-३३९९८ पुर्ण केले शेतक-याना के वाय सी करण्याचे अवाहण केले या शेतक-याना अनूदान खात्मा वर वर्ग केले. तालुक्यात के वाय सी प्रलंबित संख्या एकूण-४९९५. असून, शिल्लक अपलोड संख्या-१९४३, अपलोड शेतकरी संख्या टक्केवारी ९४.५९ आहे तालुका धारूर खरीप हंगाम २०२३ दुष्काळ अनुदान वाटप बाबत वेळोवेळी सूचना करूनही काही शेतकरी अद्याप आवश्यकती कागदपत्र संबधित तलाठी यांचे कडे दाखल केलेली नाहीत त्यामुळे त्यांची नावे ऑनलाइन यादीत आप्लोड करणे बाकी आहेत. तसेच ऑनलाईन अपलोड पान ३ वर

## मुंबई-विशाखापटणम महामार्गांवर ओबीसी बांधवांचा दोन तास रस्तारोको ; प्रा. लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाला समर्थन

**शिरूर । शंकर भालेकर**



ओबीसी आरक्षण बचावासाठी प्रा. लक्ष्मण हाके यांनी जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे गेल्या सात दिवसापासून आमरण उपोषण चालू आहे. या उपोषणाला समर्थन देण्यासाठी व महाराष्ट्र सरकारला धारेवर धरण्यासाठी सकल ओबीसी समाजाकडून मुंबई - विशाखापटणम महामार्गांवरती शिरूर तालुक्यातील शिंगारवाडीफाटा येथे बुधवारी सकाळी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. या आंदोलनाला परिसरातील गावा गावामधून मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यावतीने गेल्या दहा महिन्यापासून आंदोलन करण्यात आले असून या आंदोलनामुळे राज्य सरकारला नमते घ्यावे लागले आहे. मनोज जरांगे यांची ओबीसीच्या कोठ्यातून मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मोठा संघर्ष चालू आहे. तर मराठा समाजाला ओबीसी कोठ्यातून पान ३ वर

### शिंगारवाडीफाटा ते वडीगोद्री आज रॅलीचे आयोजन

प्रा. लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाला समर्थन देण्यासाठी आज गुरुवार दि. २० जून रोजी सकाळी १० वाजता परिसरातील दहा-बारा गावाच्या माध्यमातून शिंगारवाडी फाटा येथून मोटर सायकलसह विविध वाहनांची रॅली वडीगोद्रीला जाणार आहे. यासाठी जास्तीच्या संख्येने आंदोलनकर्त्यांनी रॅलीमध्ये सहभागी होऊन या आंदोलनाला मोठी व्यापकता द्यावी असे आवाहन आंदोलन समन्वयकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कामगार मालक अंशदान भरण्याचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र कामगार कल्याण निधि अधिनियम १९५३ च्या कलम ६(ब) मध्ये झालेल्या सुधारनेनुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार मालक अंशदानाचा भरणा करण्याचे आवाहन कामगार कल्याण आयुक्त रविराज ईळवे यांच्यकडून करण्यात आले आहे .

या अधिनियमात मार्च २०२४ मध्ये झालेल्या सुधारनेनुसार जून २०२४ पासुन कामगार अंशदानाचे दर रू. २५ आणि मालक अंशदानाचे दर रू. ७५ झाले आहेत . महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या . .. या संकेतस्थळावर हे अंशदान ऑनलाइन भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या व ५ किंवा त्यापेक्षा अधिक कामगार / कर्मचारी असलेल्या सर्व उद्योग, कंपन्या , कारखाने,बँका , व्यापारी संस्था , हॉटेल्स ,रेस्टॉरंट , हॉस्पिटल्स, ट्रांसपोर्ट कंपन्या, टूर्स आणि ट्रॅव्हल्स, मॉल्स , वर्कशॉप,मंडळे ,महामंडळे केंद्र व राज्य शासनाचे अंगीकृत उद्योग यांना हा अधिनियम लागू आहे. आस्थापनेत कार्यरत नियमित , हंगामी ,कंत्राटी कामगार अथवा कर्मचार्यांच्या वेतनातुन दर सहा महिन्यांनी जून व डिसेंबर मध्ये अंशदान कंपात करुन ते मंडळाकडे भरणा करणे कायद्याने बंधनकारक आहे. मंडळाकडे जमा होणाऱ्या निधीतुन कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध कल्याणकारी योजना , उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात येतात.

## खर्डा (शिवपट्टण) किल्ल्यावर सीड बॉल उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**



खर्डा (शिवपट्टण) किल्ल्यावर सारथी संस्थेच्या वतीने ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सीड बॉल उपक्रम राबविण्यात आला. या किल्ल्यावरील मराठ्यांच्या ऐतिहासिक विजयाला २२० वर्ष पुर्ण होवून गेली. सर्व मराठ्यांनी एकत्र येव्न निजामाशी लंढा देऊन मार्च १७९५ रोजी हा विजय मिळविला व या किल्ल्याचे सरदार अप्पासाहेब निबांळकर हे निष्ठावंत शिवभक्त होते. त्यांना खर्डा व परिसरात ० ते ८ कि. मी. च्या परिघात बारा ज्योर्तिलींग मंदिराची स्थापना केली. हि मंदिरे अतिशय जागृत, पुरातन व भव्य प्रेक्षणीय हेमाडपंथी मंदिर व निसर्गाने नटलेल्या मंदिरांना भेटी द्यायाची झाल्यास तब्बल ४० कि. मी. परिक्रमा होते व त्यामुळे देशातील बारा ज्योर्तिलीगाचे दर्शन घेतल्याचे पुण्य लाभते. तसेच किल्याच्या काही हकेचे अंतरावर रंणटेकडी आहे याच रणटेकडी वरून मराठ्यांनी निजामाला पराभूत केले होते. सारथी संस्थेच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनाचे महत्व जोपासत जवळपास पाचशे (५००) सीड बॉल विविध बी आणून तयार केले होते. व ते बी खर्डा (शिवपट्टण) किल्ल्याच्या परिसरात टाकण्यात आले. यावेळी दत्ता घुमरे,पिंपळे शुभांगी,खाकरे संतोष, प्रियंका काळे आदींची उपस्थिती होती.

## शहरातील नाले सफाई व संपूर्ण स्वच्छेते बाबत तातडीने कार्यवाही करावी -जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नाले सफाई व संपूर्ण स्वच्छेते बाबत तातडीने कार्यवाही करावी अशा सूचना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांना दिलेल्या निवेदनात दिल्या आहेत.

आगामी पावसाळा लक्षात घेता बीड शहरातील सखल भाग व इतर भागातील नाले सफाई ची कामे तातडीने पूर्ण होणे गरजेचे आहे. शहरात सध्या मोठ्या प्रमाणात जागोजागी कचरा जमा झालेला आहे. पाऊस पडल्यावर जमा झालेला कचरा हा नाल्यात जमा होतो व यामुळे नाल्या मोठ्या प्रमाणात तुंबल्या जातात. त्यामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचते व रस्त्यांवर ही मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होऊन नागरिकांना त्रास होतो. या सर्व बाबी पहता शहरातील कचरा तातडिने हटवून नाल्या साफ करणे आवश्यक आहे.शहराच्या मध्य भागातून बिंदुसरा हि नदी वाहते या नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात झाडी आलेली आहे.तसेच अनेक ठिकाणचा कचरा हा नदीच्या पात्रात अडकतो व पाणी तुंबल्या जाते अतिवृष्टी झाल्यास नदीचे पाणी शहरात घुसण्याची शक्यता आहे. यापूर्वी काही वर्षांपूर्वी बिंदुसरा नदीला मोठा पूर आलेला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झालेली होती. तरी या सर्व बाबींचा विचार करता बीड शहरातील नाले सफाई व कचरा हटविण्याचे काम तातडिने पूर्ण करण्यात यावे या करीता नगर परिषद प्रशासक व मुख्यकार्यकारी अधिकारी नगर परिषद, बीड यांना तातडिने कार्यवाही बाबत सूचित करावे अशा सूचना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्याला पुढील तीन दिवस यलो अलर्ट; घाटमाथ्यावर पावसाचा जोर अधिक, पर्यटकांसाठी सावधानतेचा इशारा



**पुणे । प्रतिनिधी**

एक आठवड्याच्या ब्रेकनंतर पुण्याला आजपासून पुढील तीन दिवस यलो अलर्ट (धशश्रश्रे -श्रशीीं) जारी केलाय. पुण्यात (झींपश थशरींहशी णविरींश) हलका ते मध्यम स्वरुपाचा पावसाची शक्यता वर्तवण्यात आली. पुण्यात २० जून ते २३ जूनपर्यंत पावसाची शक्यता असून घाटमाथ्यावर पावसाचा जोर (झींपश ठरळप छशुी) अधिक असेल. दरम्यान शेतकऱ्यांनी पुरेशा पावसाची वाट पाहून पेरणी करावी, असं आवाहन हवामान विभागाने केलंय. तसेच पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्या पर्यटकांना इशारा दिला आहे.

पुणे जिल्ह्यात जूनमध्ये साधारण पावसाने सरासरी ओलांडली आहे. ७६ टक्के अधिकचा पाऊस पडला आहे मात्र शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा आहे. पावसाने मोठा ब्रेक घेतला असला तरीही शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट नसल्याचं हवामान खात्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पश्चिम घाटाच्या परिसरात प्रामुख्याने पुणे, सातारा जिल्ह्यांत पावसाचा जोर राहणार आहे. आठवड्याभरापासून पावसाचा जोरही कमी झाला होता. मात्र, आता अरबी समुद्रावरून येणाऱ्या नैऋत्य मोसमी पावसाचा जोर वाढला आहे. पुढील चार दिवस किनारपट्टीसह पश्चिम घाटाच्या परिसरात चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे. गेल्या आठवड्यात पुण्याला पावसाने चांगलेच झोडपून काढले होते. संपूर्ण शहरात धुवाँधार पाऊस पडल्याने पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती.संपूर्ण पुणे शहराला मुसळधार पावसानं अक्षरश: झोडपून काढलंय. पहिल्यास पावसामुळे पुण्यातील अनेक भागांत पाणी शिरलं. पहिल्याच पावसात पुणे पूर्णपणे तुंबले होते. यामुळे लोकांच्या मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली.

# नेरे-दत्तवाडीतील ग्रामस्थ पाण्यासाठी आक्रमक; कुसगाव धरणात जलसमाधीचा तरुणांचा इशारा

**मारुंजी । प्रतिनिधी**

कासारसाई (कुसगाव) धरणातून नेरे, दत्तवाडी गावासाठी असलेला आरक्षित पाणीसाठा मिळावा आणि शासनाची मंजूर नेरे पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण करावी, यासाठी नेरे-दत्तवाडी ग्रामस्थ एकवटले आहेत. हक्काचे पाणी मिळवण्यासाठी नेरे ग्रामस्थांनी ग्रामसभा घेऊन एकमुखी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. तसेच, पाणी मिळाले नाही, तर आम्ही कुसगाव धरणात जाऊन जलसमाधी घेऊ, असा इशारा नेरे, दत्तवाडीतील तरुणांनी दिला आहे.

दत्तवाडी येथील दत्त मंदिरात ग्रामसभेचे आयोजन केले होते. या वेळी नेरे दत्तवाडी कृती समितीचे अध्यक्ष संदीप जाधव, सरपंच सचिन जाधव, माजी सदस्य भास्कर जाधव यांसह दोनशे ते अडीचशे ग्रामस्थ उपस्थित होते.



जलजीवन मिशनअंतर्गत नेरे पाणीपुरवठा योजनेकरिता कासारसाई (कुसगाव) प्रकल्पातून १.१९५२ दलघमी पाणीसाठा आरक्षित करण्यात आला आहे. त्यामध्ये नेरे येथे ५.०० एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, ९ लाख लिटर (दत्तवाडी) व ६.१८ लाख लिटर (खाण) उंच टाकी बांधणे नियोजित आहे. या कामासाठी निधीदेखील मंजूर झालेला आहे.

धरण क्षेत्रात नियमित पाऊस पडत असल्याने दरवर्षी येथील कुसगाव धरण १०० टक्के भरत असते. पिण्यासाठी, शेतीसाठी आणि उद्योगासाठी आरक्षित पाणीसाठा देऊनही धरणात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा शिल्लक राहत आहे. त्यातच धरणग्रस्तांच्या पुनर्वसनसाठी नेरे ग्रामस्थांनी सुमारे ३०० हून अधिक एकर जमिनी दिल्या आहेत. त्यामुळे नेरेकरांचे हक्काचे आरक्षित पाणी मिळावे यासाठी ग्रामस्थ आग्रही आहेत. सुरुवातीला गावातील काही नागरिकांनी योजनेमधील कागदोपत्री त्रुटी काढून विरोध केला होता. मात्र, पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्व राजकीय हेवेदावे बाजूला ठेवून ग्रामस्थांनी एकत्र यावे, असे आवाहन या वेळी करण्यात आले. कासारसाई येथील काही ग्रामस्थांकडून नेरेला पाणी देण्यासाठी विरोध केला जात आहे. यावर दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झालीच तर शेती आणि औद्योगिक यासाठी लागणारे पाणी बंद करून पिण्याचे पाणी देण्यासाठी प्रथम प्राधान्य दिले जाते. त्यामुळे धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असल्याने नेरे गावच्या पिण्याच्या पाण्याचा मंजूर आरक्षित साठा कोणीही अडवू शकत नाही. ही योजना पूर्ण झाल्यास पुढील ३० वर्षे गावाचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. नेरे येथील आरक्षित साठा देऊनही धरणात अधिकचा साठा शिल्लक राहणार आहे. त्यामुळे यासाठी कोणीही विरोध करू नये, असे ग्रामस्थांनी सांगितले.

# निर्मल वारीसाठी आवश्यक नियोजन करा-गिरीश महाजन

**पुणे । प्रतिनिधी**

पालखी सोहळ्यासाठीची कामे पारदर्शकता ठेवून वेळेत पूर्ण करावीत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी, पालखी मार्ग व विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल, याची विशेष खबरदारी घ्यावी. पालखी सोहळ्यात वारकर्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासह स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी बारकाईने नियोजन करा, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराजमंत्री गिरीश महाजन यांनी दिले.



विभागीय आयुक्त कार्यालयात बुधवारी आयोजित निर्मलवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, उपायुक्त समीक्षा चंद्राकार, वर्षा लड्डा-उंटवाल, विजय मुळीक, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम तसेच सातारा,

सोलापूर, नाशिक व जळगाव जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते. महाजन म्हणाले, निर्मल वारी यशस्वी होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील स्वयंसेवक, सेवाभावी संस्था, एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत आवाहन करावे. पंढरपूर शहरातील वीजपुरवठा अखंडित राहील, याची दक्षता घ्यावी. पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांच्या ठिकाणी आवश्यक असल्यास जनरेटरची सुविधा उपलब्ध करीन द्यावी. पावसाच्या पार्श्वभूमीवर पालखी मुक्कामाच्या ठिकाणी चांगली व्यवस्था होईल, याकडे लक्ष द्यावे. यावर्षी पालखी सोहळ्यासाठी गतवर्षापेक्षा अधिकचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात फिरती शौचालये आणि अधिक प्रमाणात स्वच्छता कर्मचार्यांची नियुक्ती करावी. पंढरपूर येथे पालखीतळावर पुरेशा प्रमाणात आणि मोठ्या आकाराच्या कचराकुंड्या ठेवाव्यात. जळगाव जिल्हा परिषदेने संत मुक्ताबाई पालखी सोहळ्यासोबत दोन पिण्याच्या पाण्याचे टँकर पंढरपूरपर्यंत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

# "काहीही करा जमीन विकू नका"; शरद पवारांचा गावकऱ्यांना मोलाचा सल्ला, मोदींसह अजित दादांवर शाब्दीक हल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वसर्वा आणि खासदार शरदचंद्र पवार गेल्या ३ दिवसांपासून बारामती (इरीरारींळ) दौऱ्यावर आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक गावात दौरे करुन येथील जनतेचे आभार मानत आहेत. तसेच, गेल्या ५७ वर्षांपासून येथील जनता माझ्या पाठिशी आहे, त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतही मला चिंता नव्हती. लोकं समोर येऊन बोलत नव्हते, पण दमदाटीच्या भाषणाला उत्तर देताना मतपेटीतून त्यांनी सर्वकाही दाखवून दिलं, असे म्हणत शरद पवारांनी अजित पवारांवरही (-क्षळीं झरुरी) नाव न घेता हल्लाबोल केल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे शरद पवाराचं (डहरीरव झरुरी) मूळ गाव असलेल्या काटेवाडीतही त्यांनी सभा घेतली. यावेळी, काटेवाडीकरांनी मोदींना चमत्कार दाखवला, असेही पवारांनी म्हटले. त्यानंतर, आज लोणी भापकर गावातून ग्रामस्थांना मोलाचा, वडिलकीचा सल्लाही पवारांनी दिला.

तीन दिवसीय बारामती दौऱ्यावर असलेल्या शरद पवारांनी आज बारामती तालुक्यातील लोणी भापकर गावात जाऊन



ग्रामस्थांनी संवाद साधला. यापूर्वीच्या दौऱ्यात लोकसभा निवडणूक, आगामी विधानसभा निवडणूक आणि देशातील मोदी सरकारवर भाष्य केलं. त्यानंतर आज बोलताना पवार म्हणाले की, जे काम करायचं होतं ते तुम्ही केलं, मला काही सांगायची वेळ आली नाही. मोदींपेक्षा जास्त मताने तुमचा खासदार निवडून आला आहे. मोदी सांगायचे मोदी की गॅरंटी. पण उनकी गॅरंटी यहा चली नही, मोदींनी काय माझा बांध कोरला नाही. पण, मोदींचे धोरण आपल्या हिताचे नव्हते, असे म्हणत शरद पवारांनी मोदींच्याविरोधात घेतलेल्या भूमिकेवर भाष्य केले. शेतकरी अडचणीत कसा येईल याचा विचार मोदी सरकार करते. मोदी सरकारमधील लोक म्हणतात आम्ही खाणाऱ्या लोकांचा विचार करतो परंतु पिकवणाऱ्याने पिकवले नाही तर खाणारा काय खाईल असा सवाल शरद पवारांनी केला आहे. सत्ताधाऱ्यांनी काळ्या आईशी इमान राखणाऱ्या लोकांचा विचार केला पाहिजे, असेही शरद पवार म्हणाले.

जनाई शिरसाई आणि पुरंदर उपसा योजना केल्या आहेत, योजना केल्या पण ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी आज त्याकडे ढुंकूनही बघितले नाही. आता हे बदलायचं आहे, आता राज्य हातात घ्यायचं. नीरा नदीचे पाणी स्वच्छ करण्याची गरज आहे, दुधाचे अनुदान मिळण्यासाठी हालचाल करायची तयारी आहे का? हालचाल करण्याची माझी तयारी आहे, असे म्हणत गावकऱ्यांना पवारांनी बोलते केले.

दमदाटी केली तरी कोणतं बटण दाबायचे हे तुम्हाला चांगलं माहिती आहे, ते तुम्ही दाबलं. या निवडणुकीत एकही पुढारी नव्हता, कुठं गेले होते काय माहित? मी विचारायचो हे होते का, ते होते का, ते कुणीही नव्हतं. कळलं नाही नेत्याला काय झालं? जेव्हा मतमोजणी झाली तेव्हा कळलं?. आता हा चमत्कार विधानसभेला करायचा आहे. एक चमत्कार तुम्ही करायचा एक चमत्कार मी. पहिले पाणी आणायचं, मग कोणतं कांडे रोवयाचे आणि कोणता डोस कधी द्यायचा हे मी सांगतो, असे म्हणत आगामी विधानसभा निवडणुकांचे रणशिंगही पवारांनी फुंकले. तसेच, काहीही करा पण जमीन विकू नका, जमीन विकू नका मार्ग आपण काढू असा मोलाचा सल्लाही शरद पवारांनी गावकऱ्यांना दिला.

# कात्रज दूध संघाला तीन कोटींचा नफा; दूध व दुग्धजन्य पदार्थांसाठी मार्केटिंगवर भर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघास गत वर्ष २०२३-२४ मध्ये सुमारे तीन कोटींचा नफा झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये भरीव वाढ झाल्याची माहिती संघाचे अध्यक्ष भगवान पासलकर यांनी दिली. संघाच्या दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीमध्ये वाढ करण्यासाठी मार्केटिंगवर भर देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

दूध उत्पादक शेतकर्यांना मागील वर्षात दूधफरकाची तरतूद नसताना व आर्थिक परिस्थिती नसताना देखील चालू वर्षाच्या उलाढालीतून प्रतिलिटर एक रुपयाप्रमाणे सुमारे ६ कोटी ५० लाख रुपये दूध उत्पादक शेतकर्यांना देऊन दिलासा देण्यात आला आहे. तसेच, शेतकर्यांना दूधबिले वेळेत दिली जात आहेत. संघाचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीमध्ये वाढ होण्यासाठी बाहेरील




तज्ज्ञ मार्केटिंग सल्लागारांची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे संघाच्या दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीमध्ये वाढ झाली आहे. संघातील कर्मचारी संघटनेचा त्रैवार्षिक करार करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक कर्मचार्याला एक वेतनवाढ देण्यात आलेली आहे. संघाने नव्याने कात्रज कुल्फी, कात्रज मस्तानी, चॉकलेट बर्फी व कात्रज टेट्रा पॅक दूध लाँच केल्याचे पासलकर यांनी सांगितले. संघाचे उपाध्यक्ष भाऊ देवाडे म्हणाले, संघाच्या दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी पार्लर अद्ययावत करण्यात आलेली आहेत. यामुळे विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील मोक्याच्या ठिकाणी नवीन गाळे विकत अथवा भाड्याने घेऊन संघाचे अद्ययावत विक्री पार्लर उभारण्याचा मानस आहे.

# पुण्यात पाण्याच्या टँकरमध्ये महिलेचा मृतदेह आढळल्यानं खळबळ!

## नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

**हडपसर । प्रतिनिधी**

पिण्याच्या पाण्याच्या टँकरमध्ये महिलेचा मृतदेह सापडल्याची घटना पुण्यातील हडपसरजवळील फुरसुंगी इथं घडली. गुरुवारी सकाळी हा प्रकार उघड झाल्यानं नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. (

हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संतोष पांढरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कौशल्या मुकेश मोर्या (वय २५, रा. दुगड चाळ, जेएसपीएम कॉलेज जवळ, हांडेवाडी) असं मृत महिलेचं नाव आहे. कोंढवा पोलीस ठाण्यात ही महिला हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आलेली होती. येथील पावर हाउस या भागात नेहमीप्रमाणं सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास पाण्याचा टँकर आला होता. पाण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

सुरुवातीला टँकरमधून पाणी सुरू झाले, मात्र काही वेळाने एकदमच पाणी येणे बंद झाले. पाणी बंद का झाले हे पाहण्यासाठी उतरलेल्या टँकर चालकाला साडीचा तुकडा अडकल्याचे निदर्शनास आले. साडीचा तुकडा ओढून देखील बाहेर निघत नसल्याने टँकरवर चढून त्यानं टँकरमध्ये डोकाऊन पाहिलं असता महिलेचा मृतदेह असल्याचे त्याला दिसले. त्याने याबाबत त्वरित हडपसर पोलिसांना संपर्क साधून याची माहिती कळवली.

हडपसर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी त्वरित धाव घेत हा मृतदेह बाहेर काढून पंचनामा करीत पुढील तपासासाठी हा मृतदेह ससून रुग्णालयात शव विच्छादनासाठी पाठवला आहे.

# बारामतीत आज मोफत हेल्मेट वाटप

**बारामती । प्रतिनिधी**

येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व एमक्यूआर या कंपनीच्या वतीने शुक्रवारी (ता. २१) सकाळी दहा वाजता हेल्मेटचे मोफत वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसकर यांनी दिली. बारामती एमआयडीसीतील पेन्सिल चौकात व एमआयडीसी परिसरामध्ये हेल्मेट वाटप केले जाणार आहे. दुचाकीचालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# दलालांपासून रहा सावध-अप्पर आयुक्त डॉ. वसंत परदेशी यांचे आवाहन

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी पोलिस भरतीप्रक्रिया निष्पक्ष, तटस्थ आणि पारदर्शी पद्धतीने पार पडणार आहे. केवळ गुणवत्तेच्या आधारे पोलिस दलात भरती होता येणार आहे. त्यामुळे भरतीसाठी आलेल्या तरुणांनी दलालांपासून सावध रहावे; तसेच भूलथापा आणि अफवांना बळी पडू नये, असे आवाहन पिंपरी-चिंचवडचे अपर पोलिस आयुक्त डॉ. वसंत परदेशी यांनी केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहर पोलिस दलातील २६२ शिपाई पदासाठी भरतीप्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शिपाई पदासाठी एकूण पंधरा हजार जणांनी अर्ज दाखल आहेत. बुधवार (दि. १९) पासून भोसरीतील इंद्रायणीनगर मैदानावर प्रत्यक्ष भरतीप्रक्रिया सुरू करण्यात आली. आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर सात वर्षांनी प्रथमच शहरात पोलिस भरती होत असल्याने शहरवासीयांसाठी हा एक नवीन अनुभव आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस दलात भरतीसाठी राज्याच्या कानाकोपर्यातून तरुण शहरात दाखल झाले आहेत.

पोलिस बनण्याचे स्वप्न उराशी बाळगून आलेले तरुण ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता मिळेल त्या ठिकाणी आसरा घेत आहेत. भरतीसाठी आलेल्या तरुणांमध्ये मराठवाड्यातील तरुणांची संख्या लक्षणीय आहे. सामान्य कुटुंबातून आलेल्या या तरुणांची कोणतीही फसवणूक होऊ नये, यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकारी सर्वोतोपरी काळजी घेताना दिसत आहेत.



याबाबत अपर पोलिस आयुक्त डॉ. वसंत परदेशी यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, पोलिस भरतीप्रक्रिया अतिशय पारदर्शी पद्धतीने सुरू आहे. तरुणांनीदेखील स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवावा. भूलथापा व अफवांवर विश्वास ठेवू नये. केवळ गुणवत्तेच्या आधारे पोलिस दलात भरती होणे शक्य असल्याचे उमेदवारांनी लक्षात घेणे गरजेचे आहे

पोलिस भरती प्रक्रियासंबंधीत कोणी आमिष दाखवत असेल, अफवा पसरवत असेल, दलाली, वशिलेबाजी करीत असल्यास वरिष्ठ अधिकार्यांशी किंवा सूचना फलकावर देण्यात आलेले दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी. माहिती देणार्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीची शहानिशा करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. शारीरिक चाचणीदरम्यान अनेक उमेदवारांना दुखापत होते. अशा वेळी वेळेत वैद्यकीय मदत मिळणे गरजेचे असते. या बाबींचा विचार करून भोसरी येथील इंद्रायणीनगर मैदानावर रुग्णवाहिकेसह वैद्यकीय अधिकार्यांची नियुक्ती करण्यात आली होती.


भरतीप्रक्रियेसाठी स्थानिक पोलिस, गुन्हे शाखा, विशेष शाखा यांचे अधिकारी व अंमलदार नियुक्त करण्यात आले आहेत. भरतीप्रक्रिया सुरू असताना अधिकारी व अंमलदार यांना मोबाईल वापरास बंदी घालण्यात आली होती. ज्यामुळे भरतीप्रक्रियेत आतमध्ये असलेल्या पोलिसांना बाहेरील व्यक्तींशी संपर्क करणे शक्य झाले नाही. पहिल्याच दिवशी ५६ जण अपात्र पोलिस भरतीच्या पहिल्या दिवशी ५०० जणांना बोलवण्यात आले होते. यातील २८१ जण मैदानी चाचणीसाठी हजर राहिले. मैदानी चाचणीसाठी २२५ जण पात्र ठरले. तर, इतर ५६ जण अपात्र ठरले.

भोसरीतील बालक्रीडा संकुलात राहण्याची व्यवस्था भरतीसाठी शहरात दाखल झालेले उमेदवारांची राहण्याची गैरसोय होते. मागील पोलिस भरतीच्या वेळीदेखील पुणे शहर परिसरात उमेदवार इतरत्र आसरा घेत असल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर या वेळी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी उमेदवारांची भोसरी येथील बाल क्रीडा संकुलात राहण्याची व्यवस्था केली आहे. या ठिकाणी तैनात असलेले पोलिस पडताळणी करूनच संकुलात प्रवेश दिला जात आहेत.

# ३७ वर्षांनीही एचसीएमटीआर कागदावरच; आराखड्यात मात्र तीन वेळा केला बदल

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाकांक्षी ठरू शकणारा उच्चक्षमता द्रुतगती वर्तुळाकार मार्ग तब्बल ३७ वर्षांनंतरही कागदावरच आहे, असे असताना आता या आराखड्यात पुन्हा बदलांचा घाट घातला असून, तिसर्यांदा या त्यात बदल प्रस्तावित करण्यात आले आहेत.



शहराच्या वाहतूक आणि रस्त्यांबाबत १९७५ साली एक आराखडा तयार करण्यात आला होता. त्यावेळच्या परिस्थितीनुसार शहराच्या बाहेरून वर्तुळाकार पध्दतीने एचसीएमटीआर मार्गाची आखणी करण्यात आली होती. महापालिकेच्या १९८७ च्या विकास आराखड्यात ३६ किलोमीटरचा मार्ग आरक्षित करण्यात आला. या मार्गाचा आराखडा अद्यापही कागदावरच आहे. असे असताना १९८७ नंतर या मार्गाच्या आराखड्यात २०१७ त्यानंतर २०१९ साली बदल केले होते, त्यानंतर पुन्हा एकदा या मार्गाच्या आराखड्यात तब्बल १२ ठिकाणी बदल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. यामधील काही बदल प्रत्यक्ष जागेवरील स्थितीनुसार करण्यात येत असले, तरी काही बदल हे सर्व पक्षीय नगरसेवकांनी मुख्य सभेत दिलेल्या उपसूचनांच्या आधारे प्रस्तावित करण्यात आले आहे. यासंबंधीची अधिसूचना नगरविकास खात्याने काढली असून, त्यावर नागरिकांच्या हरकती आणि सूचना मागविल्या आहेत. त्यामुळे हा मार्ग होणार की नाही याबाबत साशंकता असली, तरी आराखड्यात बदल करण्याचे उद्योग मात्र जोमाने सुरू आहेत. त्यामुळे अद्यापही हा मार्ग कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. पुढे या मार्गाला गती कशी मिळणार हे मात्र बघण्यासारखे राहणार आहे.